महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६८ वे | दिनांक : २४/०९/२०२६ | वार : गुरुवार

## शेतकऱ्यांसाठी तिजोरी खुली करा! केंद्राची वाट पाहू नका; वडेट्टीवारांचा सरकारला घेराव




**नागपूर :** राज्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इतर सर्व कामे बाजूला ठेवून राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःची तिजोरी खुली करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत जमा करावी, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, दुष्काळग्रस्त भागातील लोकप्रतिनिधींनी आपल्या वाढदिवसांचे भव्य सोहळे टाळले पाहिजेत. मुलांचे वाढदिवस दरवर्षी साजरे करता येतात. जर सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांच्या दु:खाची जाणीव नसेल, तर त्यांनी मदतीचा दिखावा करू नये. केंद्र सरकार गुजरातला मोठे आर्थिक पॅकेज देते आणि महाराष्ट्रात मात्र केवळ मते मागण्यासाठी येते. मदत जाहीर करताना महाराष्ट्राच्या पदरात अतिशय तोकडी मदत पाडली जाते. विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांचे अश्रू केवळ मुख्यमंत्र्यांच्या खांद्यावर सुकतील अशी परिस्थिती निर्माण होऊ देऊ नका. सरकारने तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात आणि फळबागांच्या नुकसानीसाठी मोठी मदत जाहीर करावी. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण केले पाहिजेत. विजय वडेट्टीवार म्हणाले की, गेल्या वर्षी 25 ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांनी 31 हजार 600 कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली होती. त्यावेळी 29 जिल्हे बाधित झाले होते. मात्र, वेगवेगळे नियम लावून प्रत्यक्षात केवळ 15 हजार कोटी रुपये (म्हणजेच फक्त 49 टक्के) देण्यात आले. केवळ आकडा मोठा दाखवून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली; त्या पॅकेजच्या उर्वरित पैशांचे काय झाले? असा सवाल त्यांनी विचारला. विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील दुष्काळावर चर्चा करण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी तात्काळ तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे. एवढे मोठे संकट असताना 'एकला चलो रे'ची भूमिका घेणे योग्य नाही. सरकारने विरोधकांना विश्वासात घेऊन सविस्तर चर्चा करावी आणि शेतकऱ्यांना ठोस मदत जाहीर करावी.

## इलेक्शन कमिशनमधील अंतर्गतवाद धक्कादायक; सुप्रिया सुळेंचा रोखठोक हल्ला



**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगातील मतभेद चव्हाट्यावर आले असून, मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराबाबत त्यांच्या दोन सहकाऱ्यांनी कॅबिनेट सचिवांकडे थेट तक्रार केल्याचे समोर आले आहे. यासोबतच SIR प्रक्रियेवरून करण्यात आलेल्या दाव्यांवरून विरोधकांनी रान पेटवले असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधताना या सर्व घडामोडींवरून निवडणूक आयोगावर जोरदार निशाणा साधला आणि मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याविषयी महत्त्वपूर्ण भाष्य केले. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा का? यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, एका सशक्त लोकशाहीसाठी आजची बातमी अर्थातच धक्कादायक आहे म्हणजे मला विश्वासच बसत नाहीये की अरे बापरे आपल्यासारख्या देशामध्ये जिथे जगामधली सगळ्यात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे बघितलं जातं महात्मा गांधींनी आणि असंख्य कुटुंबानी एवढा मोठा लढा उभा केला स्वातंत्र्य देण्यासाठी स्वातंत्र्य दिल्यानंतर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एक संविधान आणि समतेची भाषा आणि समान अधिकार प्रत्येकाला मिळावा म्हणजे कॅमेरामनला पण एक मत रिपोर्टरला पण एक मत मलाही एक मत या देशाच्या प्रधानमंत्र्यालाही एकच मत, अशी प्रक्रिया करून प्रत्येक नागरिकाला एकच मताचा अधिकार हा संविधानाने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना दिला. त्यातून इलेक्शन कमिशनची स्थापना झाली. पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, इलेक्शन कमिशनमध्ये आम्ही आणि उद्धवजींनी काय भोगलंय, हे मला काही काढायचं नाही. आज मला काही उणीदोणी काढत बसायची नाहीयत. पण तो विषय त्याच्यामुळे आम्ही खूप भोगल आणि त्याच इलेक्शन कमिशनन जे संविधानाच्या चौकटीत चालायला पाहिजे त्यातल्या अंतर्गत कलह जर हा ज्या पद्धतीने बाहेर आलाय हा धक्कादायक आहे आणि कुठल्याही सशक्त लोकशाहीला मोडून काढण्याचा पापाची सुरुवात आहे, असं पुन्हा पुन्हा अशा कृतींमधून दिसत ही काय पहिली नाही खूप चिंताजनक आहे. ही प्रक्रिया आणि कुठल्याही सशक्त लोकशाहीसाठी अतिशय हानिकारक. मला खरंतर आश्चर्य वाटतं आण धक्काही बसतोय की म्हणजे आम्ही ठीक आहे.

## उद्धव ठाकरेंचा अमित शहांना सवाल; निवडणूक आयोगावर गंभीर आरोप



**मुंबई :** निवडणूक आयोगातील (ECI) अंतर्गत वादाच्या बातम्या समोर आल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केला आहे. निवडणूक आयोग ही आता एक टोळी बनली असून, देशात लोकशाहीचा खून सुरू असल्याचा घणाघात त्यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी आदित्य ठाकरे हेदेखील उपस्थित होते. ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक प्रक्रियेत बेईमानी केली असून महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये बॅलेट पेपरवर नव्याने निवडणुका घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. गेल्या काही वर्षांपासून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यावर बोलताना ठाकरे म्हणाले की, "निवडणूक आयोगाचे काम एका टोळीसारखे सुरू आहे. ही टोळी संपूर्ण देशात हैदोस घालत असून, पक्ष फोडणे, पक्ष चोरणे आणि लोकशाहीचा खून करणे हेच त्यांचे काम आहे." या संपूर्ण टोळीचा मुख्य सूत्रधार ज्ञानेश कुमार असून, त्यांचा विद्रूप आणि भीषण चेहरा आता जगासमोर आला आहे. त्यामुळे त्यांना तात्काळ तुरुंगात टाकले पाहिजे, अशी संतप्त मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीत आयोगाने दिलेल्या निकालांवर त्यांनी सडकून टीका केली. "पहिल्या पोटनिवडणुकीत आमचे नाव आणि चिन्ह गोठवले आणि नंतर कोणतीही शहानिशा न करता ते गद्दारांना दिले. तीच पद्धत शरद पवारांच्या पक्षाच्या बाबतीत वापरली गेली आणि आता तृणमूल ग्रेससोबतही तेच सुरू आहे," असा आरोप त्यांनी केला. याशिवाय, मतदार याद्यांमधील गोंधळावर बोट ठेवत ठाकरे म्हणाले की, "लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला यश मिळाल्यानंतर, विधानसभा निवडणुकीत तब्बल ४५ लाख बोगस मतदार यादीत नव्याने घुसडण्यात आले आहेत. ज्यांच्यामुळे हे आज सत्तेची गादी भोगत आहेत, त्या लालकृष्ण अडवाणी यांचेच नाव यादीतून वगळले गेले आहे. आपल्याला हवे ते मतदार ठेवायचे आणि नको ते वगळायचे, असा भयंकर प्रकार सुरू आहे." मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या राज्यांच्या निवडणूक प्रक्रियेत मोठा हस्तक्षेप केला असल्याचा आरोप करत, या तीनही राज्यांमधील निवडणुका तातडीने रद्द केल्या पाहिजेत, अशी मागणी ठाकरेंनी केली. तसेच, या राज्यांमध्ये पुन्हा नव्याने 'बॅलेट पेपर'वर (मतपत्रिकेवर) निवडणुका घेण्यात याव्यात, असे ते म्हणाले. 'इंडियन एक्सप्रेस'मधील वृत्ताचा संदर्भ देत ठाकरे म्हणाले की, निवडणूक आयोगात आता अंतर्गत लोकशाही राहिलेली नाही. ईसीआयचे इतर दोन आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मनमानी कारभाराविरुद्ध थेट कॅबिनेट सचिवांकडे तक्रार केली आहे. हे धाडस दाखवल्याबद्दल ठाकरेंनी त्या दोन आयुक्तांचे जाहीर आभार मानले. देशातील लोकशाही वाचवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष आणि नागरिकांनी एकत्र येण्याचे आवाहन करत, न्यायव्यवस्थेने या प्रकरणाची स्वतःहून ('सुओ मोटो') दखल घेण्याची मागणी त्यांनी केली. "जनता आता रस्त्यावर उतरली नाही आणि हा लोकशाहीचा खून मान्य केला, तर देशात अराजकता आल्याशिवाय राहणार नाही," असा गंभीर इशाराही उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६

## ४०० मीटर धावण्यात रौप्यपदक; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



**जळगाव** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जळगाव व पंचायत समिती शिक्षण विभाग, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूलचा उमर आसिफ खान याने उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली.१४ वर्षांखालील ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत उमर आसिफ खानने दमदार कामगिरी करत रौप्यपदक पटकावले असून,त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.वेग,जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर उमरने हे यश संपादन केले.इकरा पब्लिक स्कूलचे खेळाडू गेल्या अनेक महिन्यांपासून विविध क्रीडा प्रकारांसाठी कठोर सराव करत आहेत.क्रिकेट,कॅरम, कुस्ती यांसह विविध क्रीडा स्पर्धांमध्ये इकराच्या खेळाडूंनी सातत्याने चमकदार कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची नवी पाने लिहिली आहेत.उमरच्या या यशामागे क्रीडा शिक्षक आमिर खान यांचे मोलाचे मार्गदर्शन,शिस्तबद्ध नियोजन आणि अथक परिश्रम महत्त्वाचे ठरले.उमर खानच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झालेल्या निवडीबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.करीम सालार,जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी उमर खान तसेच क्रीडा शिक्षकांचे विशेष कौतुक केले. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी उमरला हार्दिक शुभेच्छा देत,भविष्यातही अशीच यशस्वी कामगिरी करण्यासाठी त्याला प्रोत्साहित केले.

## अंजना अकॅडमीच्या वेदांत जगदाळेचे 'तिहेरी यश'; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



**दौलताबाद (जावेद अहमद)** : वैजापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय १९ वर्षांखालील क्रीडा स्पर्धेत अंजना प्रतिष्ठान संचलित अंजना अकॅडमी ऑफ एक्सलन्सचा विद्यार्थी वेदांत ज्ञानेश्वर जगदाळे याने दमदार कामगिरी करत गोळाफेक , थाळीफेक आणि हातोडाफेक या तिन्ही क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या अभूतपूर्व तिहेरी यशामुळे त्याची आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.वेदांतने मिळवलेल्या या यशाबद्दल अंजना प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ,अध्यक्षा स्मिता शंकर पल्हाळ,सचिव स्वर्णजित पल्हाळ,उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ, मुख्याध्यापिका स्नेहा पवार,व्यवस्थापक देव साठे,क्रिडा शिक्षक आकाश इंगळे,शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# तंत्रज्ञानाची झेप आणि वैचारिक परिवर्तनाचा प्रश्न

आधुनिक काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने संशोधनाच्या माध्यमातून अक्षरशः अविश्वसनीय अशी झेप घेतली आहे. मानवी कल्पनाशक्तीच्या पलीकडील अनेक गोष्टी आज प्रत्यक्षात साकार झाल्या आहेत. क्लोनिंग तंत्रज्ञानापासून जेनेटिक इंजिनिअरिंगपर्यंत आणि जैवतंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रांतील संशोधनापर्यंत विज्ञानाने आश्चर्यचकित करणारीआधुनिक काळात बरेच तंत्रज्ञान संशोधनातून विकसित झाले.विश्वास बसणार नाही असे संशोधन झाले. क्लोनिक पद्धती संशोधन खुप उच्च प्रतीचे तंत्रज्ञान ,त्याहून जेनेटिक इंजिनीरिंग अजूनही खुप काही.पुढचे.कल्पना करणे आवाक्याबाहेरचे आहे.जैविक अणुबॉम्ब अजूनही खुप मोठा विषय आहे.पण भारतात जे जातीय विष आणि मनुवादास काबूत करण्याचे तंत्रज्ञान विकसित असून , फुले शाहू आंबेडकर विचाधारेचे रसायन भारतीय समाजाच्या गळी उतरू नये .हे एक कोडे आहे. . विचारांचे सामर्थ्य आणि प्रचंड टाकत असून देखील विचार वारसदार आणि अनुयायी अपयशी झालो. मानवाला केंद्रबिंदू मानून त्याच्यात सर्वांग सुंदर परिवर्तन आणि बदल अपेक्षित होता.तो वैचारिक बदल झाला नाही. हे दुर्दैव त्यामुळे हे भौतिक बदल आणि प्रगतीची घोडदौड फोल ठरत आहे.अशा प्रगतीला अर्थ नाही.सामान्य माणसाची बौद्धिक आणि पोटाची भूक भागत नसेल तर जीवनाला काहीच अर्थ नाही.हा विकास तकलादू आहे.या विकासाचा लाभ सामान्य माणसाच्या काय उपयोगाचा?? असे माझे मत आहे.अंध माणसाला चमकते युग दिशादर्शक ठरू शकते का?याचे समर्पक उत्तर नाही. सर्व भकास आहे. भंपक म्हणावे नाहीतर काय...... प्रगती केली आहे. पुढील काळात काय-काय घडू शकते, याची कल्पना करणेही अनेकदा आपल्या आवाक्याबाहेरचे वाटते. जैविक शस्त्रास्त्रांसारख्या गंभीर आणि चिंताजनक विषयांनीही मानवजातीसमोर अनेक प्रश्न उभे केले आहेत.परंतु या अफाट वैज्ञानिक प्रगतीच्या पार्श्वभूमीवर एक मूलभूत प्रश्न मात्र आजही अनुत्तरित आहे—भारतीय समाजातील जातीय विषमता, जातिभेद आणि मनुवादी मानसिकतेवर मात करण्याचे वैचारिक तंत्रज्ञान आपण का विकसित करू शकलो नाही?महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि मानवमुक्तीची विचारधारा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आपण कुठे कआधुनिक काळात बरेच तंत्रज्ञान संशोधनातून विकसित झाले.विश्वास बसणार नाही असे संशोधन झाले. क्लोनिक पद्धती संशोधन खुप उच्च प्रतीचे तंत्रज्ञान ,त्याहून जेनेटिक इंजिनीरिंग अजूनही खुप काही.पुढचे.कल्पना करणे आवाक्याबाहेरचे आहे.जैविक अणुबॉम्ब अजूनही खुप मोठा विषय आहे.पण भारतात जे जातीय विष आणि मनुवादास काबूत करण्याचे तंत्रज्ञान विकसित असून , फुले शाहू आंबेडकर विचाधारेचे रसायन भारतीय समाजाच्या गळी उतरू नये .हे एक कोडे आहे. . विचारांचे सामर्थ्य आणि प्रचंड टाकत असून देखील विचार वारसदार आणि अनुयायी अपयशी झालो. मानवाला केंद्रबिंदू मानून त्याच्यात सर्वांग सुंदर परिवर्तन आणि बदल अपेक्षित होता.तो वैचारिक बदल झाला नाही. हे दुर्दैव त्यामुळे हे भौतिक बदल आणि प्रगतीची घोडदौड फोल ठरत आहे.अशा प्रगतीला अर्थ नाही.सामान्य माणसाची बौद्धिक आणि पोटाची भूक भागत नसेल तर जीवनाला काहीच अर्थ नाही.हा विकास तकलादू आहे.या विकासाचा लाभ सामान्य माणसाच्या काय उपयोगाचा?? असे माझे मत आहे.अंध माणसाला चमकते युग दिशादर्शक ठरू शकते का?याचे समर्पक उत्तर नाही. सर्व भकास आहे. भंपक म्हणावे नाहीतर काय......मी पडलो? हा खरोखरच विचार करायला लावणारा प्रश्न आहे.फुले-शाहू-आंबेडकर विचारांमध्ये परिवर्तनाचे प्रचंड सामर्थ्य आहे. तरीही त्या विचारांचे वारसदार आणि अनुयायी म्हणून आपण अपेक्षित सामाजिक व वैचारिक परिवर्तन घडवून आणण्यात अपयशी ठरलो, ही आत्मपरीक्षणाची बाब आहे.विज्ञानाने बाह्य जग बदलले; परंतु माणसाच्या मनातील पूर्वग्रह, भेदभाव आणि विषमता बदलण्याचे आव्हान अजूनही कायम आहे. मानवाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून त्याच्या जीवनात सर्वांगीण, सुंदर आणि समताधिष्ठित परिवर्तन घडणे अपेक्षित होते. मात्र केवळ भौतिक प्रगती झाली आणि वैचारिक-सामाजिक परिवर्तन मागे राहिले, तर त्या प्रगतीच्या अर्थालाच प्रश्न निर्माण होतो.आज आकाशाला गवसणी घालणारे तंत्रज्ञान आपल्या हातात आहे; पण जर सामान्य माणसाची बौद्धिक भूक, पोटाची भूक आणि सन्मानाने जगण्याची गरज भागत नसेल, तर या विकासाचे अंतिम फलित कोणासाठी आणि कशासाठी?विकासाचा खरा अर्थ केवळ उंच इमारती, अत्याधुनिक तंत्रज्ञान, वेगवान यंत्रणा किंवा आर्थिक वाढ यात नसून, प्रत्येक माणसाला समान संधी, प्रतिष्ठा, न्याय, शिक्षण, अन्न आणि माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळण्यात आहे.म्हणूनच प्रश्न तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा नाही; प्रश्न आहे—या प्रगतीचा प्रकाश समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचला आहे का?डोळ्यांसमोर प्रचंड प्रकाश असला, तरी एखाद्याला दिशा दिसत नसेल तर त्या प्रकाशाचे प्रयोजन काय? त्याचप्रमाणे सामाजिक समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचा मार्ग प्रशस्त करणारे वैचारिक परिवर्तन घडत नसेल, तर केवळ भौतिक प्रगती अपुरी ठरते.म्हणून आज गरज आहे ती केवळ नव्या तंत्रज्ञानाची नव्हे, तर नव्या मानवी विचारतंत्रज्ञानाची. विज्ञानाची झेप आणि मानवतेची उंची यांचा संगम झाला, तरच विकास खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.नाहीतर तंत्रज्ञान प्रगत होईल, जग बदलेल; पण माणूस मात्र तिथेच उभा राहील—हीच खरी शोकांतिका आहे.

**मधुबानंदा प्रधान अकोला**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६

## हिंदी भाषेच्या माध्यमातून बहुविध रोजगाराच्या संधी- प्रा. डॉ. सुशिल उपाध्याय




**कन्नड :** आजच युग स्पर्धेचे आहे.युवका समोर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.एआईआणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोजगार कमी होत आहेत अशी भिती बाळगण्याची मुळीच गरज नाही. केंद्रीय निदेशालय युवकांसाठी नवलेखक शिबिर आणि हिंदी भाषेच्या अनुषंगाने वेगवेगळ्या योजना राबवत असते. विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा असे प्रतिपादन डॉ.सुशिल उपाध्याय ,प्रसिद्ध साहित्यकार आणि समीक्षक उत्तराखंड यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित प्रमुख पाहुणे दिनेश शर्मा भाषातज्ञ देहरादून यांनी 'साहित्य आणि आणि मानवी मूल्य 'या विषयावर मत मांडले. ते म्हणाले 'अलीकडच्या काळात मानवी मूल्यांचे जतन होताना दिसत नाही.त्यामुळे संवेदनशीलता कमी होत आहे.संस्कारशील पीढी घडविण्यात साहित्याची भूमिका महत्वपूर्ण आहे. असे प्रतिपादन केले. यावेळी हिंदी सप्ताहा निमित्त भित्तीपत्रके आणि हिंदी विशेषांकांचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. पूजा चव्हाण ,रूपाली बेलसरे ,साक्षी धनेधर यांनी आपल्या कविताही सादर केल्या.आजीवन शिक्षण विस्तार विभाग आणि हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित काव्य वाचन आणि वकृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आली. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले यांनी 'भाषा शिक्षणात ही रोजगाराच्या विपुल संधी आहेत. विद्यार्थ्यांनी विविध भाषांचे अध्ययन केले पाहिजे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु.साक्षी धनेधर ने केले प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ.गोविंद बुरसे यांनी तर आभार डॉ. अलका गडकरी यांनी मानले.प्रा. डॉ.प्रतिभा अहिरे, डॉ प्रशांत संघई, डॉ. शैलेश कोल्हे डॉ. रामचंद्र झाडे. डॉ. बी .एच .गायकवाड. डॉ. सीमा काशीद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.


## सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ तथा लेखिका डॉ. वृषाली किन्हाळकर साधणार विद्यार्थ्यांच्या आईंशी संवाद

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवगिरी कनिष्ठ महाविद्यालय येथे विज्ञान ,कला , वाणिज्य व एमसीव्हीसी शाखेतील विद्यार्थ्यांच्या मातांसाठी पालकांसाठी आई मेळाव्याचे आयोजन दि. 28 सप्टेंबर 2026 सोमवार रोजी सकाळी 11.वा. महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात करण्यात आले आहे.या आई मेळाव्यासाठी सुप्रसिद्ध कवयित्री,लेखिका तथा स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.वृषाली किन्हाळकर " किशोरवयीन मुलांमधील समाजमाध्यमांचे वाढते प्राबल्य आणि आईची भूमिका " या विषयावर हितगुज करणार आहेत.आई मेळाव्यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांची मानसिकता, स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी करावी लागणारी जीवघेणी मेहनत, त्यांच्यावर येणारा मानसिक ताणतणाव, आई-वडिलांनी या काळात घ्यावयाची जबाबदारी आणि त्यांनी घ्यावयाची काळजी, विद्यार्थ्यांचे नैराश्य आणि आई पालकांची भूमिका याविषयी सखोल मार्गदर्शन या मेळाव्यात करण्यात येणार आहे. अशा प्रकारचे आई मेळावा घेणारे "देवगिरी महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय ठरले आहे".आई मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी अधिष्ठाता डॉ.कानन येळीकर (जी.एम.सी. एच. छ.संभाजीनगर)भूषविणार आहे. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवी पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या आई मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांच्या आईंनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा जेईई नीट सेलचे संचालक,संयोजकप्रा.अरुण काटे,उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे व उपप्राचार्य प्रा.विजय नलावडे यांनी केले आहे.

## राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या अध्यक्षपदी डॉ. उमेश मोगले तर महामंत्रीपदी डॉ. नानासाहेब गोरे यांची निवड



डॉ. उमेश मोगले



डॉ. नानासाहेब गोरे

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ (ABRSM) ही प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठापर्यंतच्या शिक्षकांचा आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित घटकांची एक देशव्यापी संघटना आहे. या संघटनेची स्थापना १९८८ मध्ये झाली असून हा एक भारतीय संस्कृती आणि मूल्यांशी जोडलेली देशव्यापी बिगर-सरकारी आणि शैक्षणिक संघ आहे. याचे नाव केवळ 'शिक्षक महासंघ' न ठेवता 'शैक्षिक महासंघ' ठेवले आहे, कारण यात केवळ शिक्षकच नव्हे तर शिक्षण, समाज, पालक, विद्यार्थी आणि शाळा या सर्वांचा समावेश होतो.राष्ट्रच्या हितासाठी शिक्षण, शिक्षणाच्या हितासाठी शिक्षक आणी शिक्षकांच्या हितासाठी समाज ही या संघटनेची प्रमुख सूत्रे आहेत. शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीसाठी ही सूत्रे मार्गदर्शक मानली जातात.या तीन सूत्रांमधून राष्ट्र, शिक्षण, शिक्षक आणि समाज या सर्वांना एकाच धाग्यात बांधून देशाच्या प्रगतीचा मार्ग दाखवला आहे. संघटनेचे काम शिक्षकांच्या हक्कांचे रक्षण करणे तसेच सांस्कृतिक राष्ट्रवादाचा विचार शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात रुजवणे हे आहे.दि.२२सप्टेंबर, २०२६ रोजी या संघटनेची बैठक जे.ई.एस. महाविद्यालय जालना येथे ABRSM चे प्रांत महामंत्री प्रा.डॉ. दिलीप अर्जुने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीमध्ये वरीष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांची जिल्हा कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये जिल्हाध्यक्ष म्हणून डॉ. उमेश मोगले यांची निवड करण्यात आली तर डॉ. नानासाहेब गोरे यांची जिल्हा महामंत्री म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष डॉ. अमोल खांडेभराड, सहमंत्री डॉ. किशोर तापडिया, कोषाध्यक्ष डॉ. सुनील इंदूरकर, महिला प्रमुख डॉ. अरुणा म्हारोळकर, सहमहिला प्रमुख डॉ. धनश्री देशपांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्यात. मावळते जिल्हाध्यक्ष डॉ. हेमंत वर्मा यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून नवीन अध्यक्षांकडे रीतसर सूत्रे सोपवली. या बैठकीचे सूत्रसंचालन माजी महामंत्री डॉ. बाबू तोटरे यांनी केले तर डॉ. नानासाहेब गोरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. यावेळी ABRSM चे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदी भाषा ज्ञानपरंपरेशी जोडणारी आणि रोजगाराच्या नव्या संधी देणारी भाषा - डॉ. विनोदकुमार वायचळ




**उमरगा :** हिंदी दिवस पखवाड्यानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या वेळी डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी 'भारतीय ज्ञान परंपरा, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि रोजगाराच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते.पुढे बोलताना डॉ. वायचळ म्हणाले की, भारतीय ज्ञान परंपरेमध्ये विविध विषयांचे समृद्ध ज्ञान सामावलेले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव शिक्षण, संशोधन, उद्योग आणि रोजगाराच्या क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात होत आहे. विद्यार्थ्यांनी AI तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करून आपल्या ज्ञान व कौशल्यांमध्ये भर घातली पाहिजे. बदलत्या काळानुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांसमोर रोजगाराच्या अनेक नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय अस्वले म्हणाले की हिंदी ही केवळ संवादाची भाषा नसून ती भारतीय ज्ञान, संस्कृती आणि विचारपरंपरेशी जोडणारे प्रभावी माध्यम आहे. आजच्या AI आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी भाषिक ज्ञानासोबत तंत्रज्ञान व रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. अशा व्याख्यानांमधून विद्यार्थ्यांना बदलत्या जगातील नव्या संधींची जाणीव होते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. पी. इंगळे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले व डॉ. डी. बी. ढोबळे, डॉ. सन्मुख मुच्छटे , डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, प्रा. प्रशांत साळुंके, प्रा. जी. के. पाटील, प्रा. बीना लोकरे, प्रा. गोविंद नागदे प्रा. संदीप गुरव, प्रा. अनिल चव्हान, प्रा दयानन्द जाधव यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रतीक्षा शिंदे हिने केले तर पूजा हांडे यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६


## पोपटदादा

पोपटदादा पोपटदादा
आवडतोस तू खूप
उंच आकाशी उडतांना
मनमोहन दिसे रूप

डाळींबाचे दाणे पाहून
फुलतात तुझे गाल
पान खाऊन खाऊन
तोंड झाले का लाल?

आवडीने पेरू खातोस
उंच झाडावर जाऊन
दुखत नाही का पोट
हिरवी मिरची खाऊन ?

पाऊस सुरू असता
गाठतो झाडाची ढोली
तुझे रक्षण करणारी जणू
नैसर्गिक उबदार खोली

आमच्या आवाजाची
करतोस सदा नक्कल
प्रश्न पडतो मला
कुठून आली अक्कल?



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## माधवराव पाटील महाविद्यालयात उत्साहात रंगले कवी संमेलन : नामवंत कवींच्या बहारदार काव्यवाचनाने रसिकांची मने जिंकली




**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष, सांस्कृतिक विभाग आणि मुरूम येथील श्रीराम गणेश मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवी संमेलन मंगळवार (ता. २२) रोजी उत्साहात पार पडले. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि समकालीन विषयांवरील कवितांच्या प्रभावी सादरीकरणामुळे सभागृहात काव्यरसाची मैफल रंगली. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, संस्थेचे संचालक प्रा. डॉ. सतीश शेळके, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, मुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, श्रीराम गणेश मंडळाचे अध्यक्ष श्रीराम कुलकर्णी, डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. गोपाळ कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. चौकट : कविवर्य गणेश घुले (छत्रपती संभाजीनगर) यांनी आपल्या प्रभावी शैलीत काव्यवाचन करीत बालमन, शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आशय मांडला. आशयघन, संवेदनशील, वास्तववादी कवितांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या कवितांमधून माणुसकी, सामाजिक वास्तव, नातेसंबंध, संघर्ष, प्रेम आणि जीवनमूल्यांचे प्रभावी दर्शन घडले. शब्दांतील साधेपणा आणि आशयातील प्रभावीपणा यामुळे त्यांच्या कवितांना उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली."शब्दांतून वास्तवाचे प्रतिबिंब आणि कवितेतून माणुसकीचा हुंकार" अशी त्यांच्या काव्यवाचनाची अनुभूती उपस्थितांना आली. सामाजिक जाणिवा आणि मानवी संवेदनांना स्पर्श करणाऱ्या त्यांच्या कवितांनी कार्यक्रमात विशेष रंग भरला. चौकट : डॉ. स्वप्नील चौधरी (पुणे) यांनी सामाजिक वास्तव आणि समकालीन प्रश्नांना भिडणाऱ्या कवितांचे सादरीकरण केले. त्यांच्या चर्चेत असलेल्या 'चल दंगल समजून घेऊ' या रचनेने सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याचा संदेश दिला. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. चौकट : कवी संतोष नारायणकर (परभणी) यांनी आपल्या खास ग्रामीण बोलीतील विनोदी आणि आशयपूर्ण शैलीने वातावरणात रंगत आणली. 'मामाला माझ्या' या लोकप्रिय रचनेतील "मामाला माझ्या दोन होत्या पोरी, एक होती काळी एक होती गोरी..." या ओळींनी सभागृहात हास्याची लकेर उमटली. त्याचबरोबर त्यांच्या कवितेतून ग्रामीण जीवन, मानवी नातेसंबंध आणि सामाजिक वास्तवाचे विविध पैलू प्रभावीपणे समोर आले. चौकट : कवी श्रीराम पोतदार (पुणे) यांनी या कवी संमेलनात समाज, संस्कृती, पर्यावरण, युवकांचे प्रश्न, स्त्रीशक्ती, शेतकरी, ग्रामीण जीवन, मानवी नाती, प्रेम, विद्यार्थी आणि शिक्षक, समकालीन सामाजिक वास्तव अशा विविध विषयांवर काव्यरूपी भाष्य करण्यात आले. चारही कवींनी आपल्या स्वतंत्र शैलीत कविता सादर केल्याने कार्यक्रमाला वैविध्यपूर्ण साहित्यिक रंगत लाभली. मुरूम येथील निर्मलकुमार लिमये, आशिष वेदपाठक यांनीही याप्रसंगी आपल्या कविता सादर केल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राम बजगिरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले यांनी तर आभार श्रीराम कुलकर्णी यांनी मानले. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच साहित्यप्रेमी रसिकांची मोठी उपस्थिती होती. कवींच्या बहारदार सादरीकरणाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कवी संमेलन संस्मरणीय ठरले.






## शिवछत्रपती महाविद्यालयात 'पालक मेळावा २०२६ संपन्न



**छत्रपती संभाजीगनर :** डॉक्टर-इंजिनिअरच्या पलीकडचे जग' या विषयावर मार्गदर्शन छत्रपती संभाजीनगर:म.शि.प्र. मंडळ संचालित शिवछत्रपती महाविद्यालयात मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी 'पालक मेळाबा-२०२६' अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यासाठी 'डॉक्टर-इंजिनिअरच्या पलीकडचे जगः करिअर, कौशल्य आणि सुजाण पालकत्व!' हा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि काळाची गरज असलेला विषय ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उच्च न्यायालयाचे नामांकित ॲड साई महाशब्दे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. डॉ. श्रीमती सी एस. पाटील लाभल्या होत्या बदलत्या काळातील करिअरच्या संधींवर प्रमुख मार्गदर्शक ॲड. साई महाशब्दे यांनी पालकांशी संवाद साधताना सांगितले की, "आजच्या युगात केवळ डॉक्टर किंवा इंजिनिअर बनणे म्हणजेच यश नव्हे. या पारंपरिक क्षेत्रांच्या पलीकडेही करिअरच्या हजारो सुवर्णसंधी उपलब्ध आहेत पालकांनी मुलांच्या आवडी-निवडी आणि त्यांच्यातील अंगभूत कौशल्ये ओळखून त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे " सुजाण पालकत्व कसे असावे, याबद्दल त्यांनी अनेक उदाहरणे देऊन पालकांचे प्रबोधन केले आज विद्यार्थ्यांचा संबाद पालकांची कमी होतो त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रगती होत नाही विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव दिली पाहिजे विद्यार्थ्यांच्या आवडी नुसार त्यांना करिअर देण्यासाठी त्यांना मुक्त संवाद पालकांशी केला पाहिजे सतत नविन संकल्पना विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्या पाहिजे असे ॲड. साई महाशब्दे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाची भूमिका आणि विद्यार्थ्यांचा विकास अध्यक्षीय भाषणात प्राचार्या प्रो. डॉ. श्रीमती सी. एस. पाटील यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ गुण नव्हे, तर कौशल्यावर आधारित शिक्षण देणे ही आजची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कुटुंबाची/समाजाची ओळख विद्यार्थ्यांशी संवाद हे सूत्र सांगितले तसेच पाल्य, शिक्षक व पालक हा एक त्रिकोण नेहमी सारखा असला पाहिजे व स्वप्न साकार होण्यासाठी आपल्या पाल्याशी संवाद झाला पाहिजे चांगल्या बिचारांची, चांगली संगत, प्रेरणा, मार्गदर्शन, चांगले संस्कार फार महत्वाचे आहे. तसेच, पालकांनी आणि महाविद्यालयाने एकत्रित प्रयत्न केल्यास विद्यार्थी समृद्ध राष्ट्राचे सुसंस्कारीत नागरिक बनतील, असा विश्वास महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो डॉ श्रीमती सी एस. पाटील यांनी व्यक्त केला प्रमुख उपस्थिती आणि नियोजन महाविद्यालयाच्या भव्य सभागृहात दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास खालील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली . डॉ. संगीता राजमाने (उपप्राचार्य) प्रा. भरत वहाटुळे (उपप्राचार्य) डॉ. अश्रुबा गवळी (पर्यवेक्षक) प्रा. राहुल पाटील (पर्यवेक्षक) कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा उपप्राचार्य भरत वहाटुळे सर यांनी केले, सूत्रसंचालन डॉ आश्रुबा गवळी सर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. झावरे पद्मजा मॅडम यांनी दिला आणि आभार प्रदर्शन प्रा प्राजक्ता मेहता मॅडम यांनी केले महाविद्यालयाच्या सर्व समिती प्रमुख सदस्य तसेच प्राध्यापक वृंदांनी अतिशय उत्कृष्टपणे नियोजन केले. या मेळाव्यामुळे पालकांच्या मनातील अनेक शंकांचे निरसन झाले असून, महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६


## स्पर्धा परीक्षेच्या यशासाठी सातत्य, आणि आत्मविश्वास आवश्यक




**करमाड :** स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी निश्चित ध्येय, सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि आत्मविश्वास आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षा ही केवळ नोकरी मिळविण्याची परीक्षा नसून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची, विचारक्षमतेची, निर्णयक्षमतेची आणि व्यक्तिमत्त्वाची कसोटी असते, असे प्रतिपादन विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक प्राध्यापक प्रा. डॉ. संजीव शिंदे यांनी केले.राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे करिअर गाईडन्स प्लेसमेंट सेल, करिअर कट्टा विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित *'स्पर्धा परीक्षा व व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळे'*त ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासूनच आपले ध्येय निश्चित करून अभ्यासाचे नियोजन करावे. प्रत्येक विषयाच्या मूलभूत संकल्पना समजून घेण्याबरोबरच वर्तमान घडामोडी, वृत्तपत्र वाचन, संदर्भग्रंथ, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा सराव आणि नियमित उजळणी यावर भर द्यावा, असा सल्ला त्यांनी दिला. मोबाईल व सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळून वेळेचा सदुपयोग करावा, असेही त्यांनी सांगितले.स्पर्धा परीक्षेच्या तयारीसोबतच संवादकौशल्य, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, शिस्त आणि सामाजिक जाणीव या व्यक्तिमत्त्व विकासाच्या बाबींवर विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे. "अपयश हे शेवट नसून पुढील यशासाठीचा अनुभव आहे," या भावनेने विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. कालिदास फड यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांनी, "यश हे एका रात्रीत मिळणारा चमत्कार नसून निरंतर प्रयत्नांची प्रक्रिया आहे," असे सांगत विद्यार्थ्यांनी दररोज नियोजनबद्ध अभ्यास करण्याचे आवाहन केले.यावेळी डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर,डॉ. सुखदेव पोटदुखे डॉ. जयश्री पाटील, प्रा. योगेश शिंदे, डॉ. नानासाहेब लावंड, डॉ. ललित गोल्डे , प्रा. प्रशांत माटे, डॉ. इम्रान पठाण, प्रा. तन्मय भावसार, प्रा. प्रकाश बांगर तसेच शिक्षकेतर कर्मचारी भगवंत देशपांडे, रमेश जाधव, कैलास जाधव, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव, अलका कुलकर्णी, सुनीता पारेकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. किशोर काळे यांनी केले, तर आभार डॉ. ज्ञानेश्वर कोटुळे यांनी मानले. कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## आयुर्वेद दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील वाघी बोबडे येथील आयुष्मान आरोग्य मंदिर (आयुष) येथे आज बुधवार दि. 23 सप्टेंबर रोजी आयुर्वेद दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत दहिवाल यांच्या हस्ते धन्वंतरी व ओमकार प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर आयुर्वेद दिनाची प्रार्थना घेण्यात आली. प्रतिमा पूजन व प्रार्थना झाल्यानंतर योग प्रशिक्षक गजानन चौधरी यांनी योग मार्गदर्शन केले. यानंतर लगेचच ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना डॉ. अनंत दहिवाल यांनी "आयुर्वेद दिनाचे महत्त्व व सध्याची जीवनशैली" या विषयावर आयुर्वेद मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम संपल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्य तपासणी शिबिरात 32 महिला व 46 पुरुषांची तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले.या सर्व कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.वैद्यकीय अधिकारी डॉ.अनंत दहिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रशिक्षक गजानन चौधरी, औषध निर्माता विजयकुमार पोपळाईत, आरोग्य सेविका श्रीमती स्वाती पोहकर, आशा वर्कर श्रीमती मीना कंठाळे व इतर कर्मचारी वृंद यांनी पुढाकार घेतला.

## बुद्धिबळ व बॅडमिंटन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, कन्नड व बाळासाहेब पवार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या बुद्धिबळ व बॅडमिंटन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दि.23 सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक दिव्य मराठीचे स्पेशल प्रोजेक्ट स्टेट हेड सुभाष बोंद्रे हे उपस्थित होते. तर वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, प्रसिद्ध क्रीडा प्रशिक्षक प्रा.उदय डोंगरे, पत्रकार राजानंद सुरडकर, जिल्हा परिषद बहिरगाव शाळेचे क्रीडा शिक्षक श्याम खोसरे, प्रा. संतोष देशमुख आदींची व्यासपिठावर उपस्थिती होती.यावेळी पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या 36 विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. उदय डोंगरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात प्रा. डोंगरे म्हणाले की, " कन्नड तालुक्यासारख्या ग्रामीण भागातून चांगले खेळाडू निर्माण व्हावेत या जाणिवेतून सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने गेल्या चार वर्षापासून बुद्धिबळ आणि बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा या स्पर्धांमध्ये साधारण 650 विद्यार्थी सहभागी झाले होते. भविष्यात वाचनालयाकडून या खेळासाठी ग्रामीण विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देता येते का? याचाही विचार आम्ही करत आहोत " असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दैनिक दिव्य मराठीचे स्पेशल प्रोजेक्ट स्टेट हेड सुभाष बोंद्रे आपल्या भाषणात म्हणाले की, " विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबत खेळाकडेही लक्ष द्यायला हवे. हल्ली मोबाईल , सोशल मीडियामुळे खेळापासून दूर जात आहेत. त्या पार्श्वभूमीवर सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय ही संस्था उत्तम खेळाडू घडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे , ही बाब खूप महत्त्वाची आहे. मुलांनी उत्तम शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी किमान एका तरी क्रिडाप्रकारात नैपुण्य प्राप्त करायला हवे. परिश्रम करायची तयारी , सरावाचे सातत्य आणि उत्तम मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी नक्कीच खेळाच्या माध्यमातून स्वतःचे, कुटुंबाचे आणि देशाचे नाव उज्वल करू शकतात." या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय त्रिभुवन यांनी केले तर ऋषिकेश शिवदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास विजेते विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक व नागरिक उपस्थित होते.

## गढी येथे कुमार/कुमारी अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे शानदान उदघाटन



**बीड :** विद्यार्थ्यांनी खेळात करिअर करावे! असे प्रतिपादन युवानेते श्री. रणवीर (काका)अमरसिंह पंडित यांनी केले. ते श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, गढी येथे बीड जिल्हा कबड्डी असोसिएन आयोजित कुमार /कुमारी अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे उदघाटक म्हणुन बोलत होते. पढे बोलताना म्हणाले की कबड्डी हा महाराष्ट्राच्या मातीचा खेळ आहे. त्या कबड्डी खेळाला वैभव मिळवुन देण्यासाठी आपण प्रमाणिक प्रयत्न करणे काळाजी गरज आहे. प्रत्येक खेळाडुने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड व्हावी असे खेळावे! असे सांगुन या निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी व्यासपीठावर या स्पर्धेचे आयोजक तथा बीड जिल्हा कबड्डी सोसिएशन चे कार्यवाह प्राचार्य डॉ. विश्वास कदम, प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे,प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे उपमुख्याध्यापक प्रा. गणेश पवळ, प्रा. डॉ. ब्रम्हनाथ मेंगडे, प्रा. कैलास जगदाळे, श्री. मधुकर गर्जे, प्रा.डॉ.भागचंद सानप, प्रा.डॉ.संतोष वनगुजरे, श्री.प्रताप शेंडगे श्री. माधव चव्हाण संस्था, श्री. चोधरी सर, श्री. चौरे सर, आदि मान्यवर उपस्थित होते. या कुमार गट व कुमारी गट अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.केतन गायकवाड,प्रा.डॉ. बाळासाहेब सरपते, प्रा. डॉ. प्रविण शिलेदार व श्री. मधुकर धुताडमल आदिनी अथक परिश्रम घेतले, या उदघाटन समारंभाचे संचलन प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी केले तर आभार प्रा. केशव सुर्वे यांनी मानले. या आठ निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत बीड जिल्ह्यातील बहुसंख्य क्रिडामंडळे व खेळाडुंनी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धा सुरु आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६


## सदैव सावध रहावे !

शेती मालाचे भाव पडतांना,
महागाई नियमित वाढणार.
महागाईचा निर्देशांक मात्र.
शेती मालाला सोडून काढणार. १

जगाच्या पोशिंद्याला इथे,
दररोज दिवसा लुटल्या जाते.
शेतीमालाचे भाव काढतांना,
सरकार महागाई चे गीत गाते. २

दोन तीन चार टक्क्यांनी,
सतत होते महागाईत वाढ.
शेतीमालाचे भाव सोडून,
सरकार पुरवते सर्वांचे लाड. ३

शेतीमालाचे भाव मात्र इथे,
वर्षानुवर्ष स्थिर कसे राहतात.
कोणीच काही बोलत नाहीत,
सारे उघ्याने अन्याय पाहतात. ४

बळीराजाच्या शेतीमालाचे,
वाढत नाही कधीच का भाव ?
अस्मानी सुलतानी संकट ही,
बळीवर टाकत असतात डाव. ५

राबराब राबून पिकवितो माल,
दलाल मात्र हळूच साधतो डाव.
शेतीमालाचे भाव पाडून पाडून,
बळीराजाचे उध्वस्त करतो गाव. ६

डाव दलालांचे ओळखून आता,
बळीराजा तू सदैव सावध रहावे.
आपला विकास आपल्या हाती,
सतत सातत्याने होतांना पहावे. ७

आपण पिकविलेल्या मालाला,
आता आपणच लावावे भाव.
डाव साधून वर्मी घाव घालताच,
सारेच करतील तुला सलाम राव. ८



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## गावच्या शिवारात दिसतो बा...

भाकरीच्या शोधात
गाव मागे पडलं,
शहराच्या वाटेवर
पाऊल पुढे सरकलं...

देह शहरात आला,
पण मन मात्र
गावच्या मातीशी
नाळ जुळवूनच राहिलं.
एगावच्या शिवारात
पाऊल पडलं की—
*बा* ...
तू आठवतोस!
मातीच्या प्रत्येक कणात,
शेताच्या प्रत्येक बांधावर,
वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकीत
तुझाच स्पर्श जाणवतो.

शिवार दिसतं,
घराकडे नजर जाते
आणि मन म्हणतं—
तू आत्ताच दारातून येशील,
हसत विचारशील—
“ ***आलास का, आरिफ?*”**
गावगाड्यातली माणसं,
मित्र, सगे-सोयरे,
ओळखीची कितीतरी चेहरे
आजही भेटतात;
पण त्या गर्दीतही
माझे डोळे
तुझीच सावली शोधत राहतात.
जुन्या आठवणींच्या उन्हात
शहर क्षणभर खुजं भासतं,
आणि गाव—
आभाळाएवढं विस्तारतं.
गावात पाऊल टाकलं की
एक गोड भास होतो—
तू समोर उभा आहेस,
हसतोयस, बोलतोयस...
आणि मी पुन्हा
तुझ्या सावलीतला
तोच लहानसा आरिफ होतो.
पण बा...
तू गेलास
त्या दिवसापासून
आईच्या चेहऱ्यावरचं हसू
दाराशीच थांबून राहिलं.
तिच्या डोळ्यांत
आजही तुझी वाट पाहणारा
न संपणारा विरह दाटतो.
ओठांवर शब्द नसतात,
तरी अश्रू
तुझं नाव पुकारत राहतात;
तिच्या शांततेच्या तळाशी
तुझ्या अनुपस्थितीचा
आक्रोश धगधगत राहतो.
आम्ही भावंडंही
तुझ्या आधाराविना
दिशाहीन झालो...
घर उरलं,
भिंती उरल्या,
अंगण उरलं;
पण घरपण मात्र
कुठेतरी हरवून गेलं.
तुझ्या आठवणींच्या सावलीत
मनं तुटतात,
आणि तुझ्याच प्रेमाच्या ऊबेत
पुन्हा जुळून येतात.
तू आठवतोस—
प्रत्येक दिवसात,
प्रत्येक श्वासात...
तूच बा,
तूच आमच्या जगण्याला
आधार देणारी
ती अदृश्य सावली.
कबरीसमोर उभा राहून
दुवासाठी हात उचलतो,
तेव्हा हात थरथरतात...
कारण त्या एका दुवेत
आईचे अश्रू,
भावंडांची पोकळी
आणि माझं सगळं बालपण
एकवटलेलं असतं.
डोळे मिटले की
तू पुन्हा जवळ येतोस—
बोलतोस, हसतोस,
खांद्यावर हात ठेवतोस...
आणि क्षणभर
बालपण पुन्हा
अंगणात उतरून येतं.
आठवणी मनाला कवटाळतात,
डोळे पाणावतात,
शब्द ओठांवरच विरून जातात...
मनाचा हंबरडा
निःशब्द आभाळात मिसळतो
आणि तुझ्या नावाने
सगळं आभाळ भरून येतं.
बा...
तुझ्यासाठी दुवा करताना
हृदय भरून येतं,
आवाज थरथरतो;
पण विश्वास
मनात उजळत राहतो—
*“**या रब*** ,
ज्याने आमच्यावर
आयुष्यभर भरभरून प्रेम केलं,
त्या माझ्या बापावर
तूही भरभरून रहमत कर.
त्याच्या साऱ्या चुका
माफ कर
आणि त्याला
***जन्नतुल फिरदौस अता कर*** ...”
आईच्या प्रत्येक अश्रूत
तुझ्यासाठी दुवा आहे;
भावंडांच्या प्रत्येक हुंदक्यात
तुझी वेदनादायी आठवण आहे;
आमच्या प्रत्येक श्वासात
तुझं प्रेम अजूनही जिवंत आहे.
गावच्या वाटेवर,
मातीच्या सुगंधात,
शेताच्या बांधावर,
शिवाराच्या हिरवाईत—
आईच्या ओलावलेल्या डोळ्यांत,
भावंडांच्या हरवलेल्या हसण्यात,
आणि माझ्या धडधडत्या काळजात
आजही
तू दिसतोस, बा...
तू गेलास दूर,
पण आईच्या मनातून नाही;
भावंडांच्या आठवणीतून नाही;
माझ्या हृदयातून तर
कधीच नाही.
कारण—
जगण्यात दिसतोस, बा...
आठवणींत दिसतोस, बा...
भविष्याची हाक होऊन,
वर्तमानाचा श्वास होऊन
आजही तू माझ्यासोबत आहेस.
गावच्या शिवारात दिसतोस, बा...
मातीच्या प्रत्येक कणात
तुझ्या पावलांची चाहूल आहे.
आईच्या प्रत्येक अश्रूत
तुझ्या नावाची हाक आहे.
भावंडांच्या प्रत्येक आठवणीत
तुझ्या प्रेमाची ऊब आहे.
आम्ही जिथे आहोत,
तिथे तुझीच सावली
आमच्या सोबत आहे.
तू नाहीस म्हणून
गाव रिकामं झालं नाही...
तुझ्या आठवणींनी
ते आजही धडधडतं आहे.
शिवाराच्या वाऱ्यात
तुझा श्वास जाणवतो,
मातीच्या सुगंधात
तुझं अस्तित्व भासतं,
आणि आमच्या प्रत्येक दुवेत
तुझ्यासाठी प्रेम
अश्रूंनी उजळत राहतं.
आईच्या डोळ्यांत वाहणारा विरह
हा शेवट नाही...
तो तर
तुझ्या आठवणींच्या रूपाने
आयुष्यभर जपला जाणारा
एक निःशब्द दुवा आहे.
म्हणूनच—
गावच्या शिवारात दिसतोस, बा...
आईच्या डोळ्यांत
तुझा विरह वाहतो...
आणि आमच्या प्रत्येक दुवेत
तुझं प्रेम
अश्रूंनी उजळत राहतं...
तू नाहीस—
पण तुझी सावली आहे.
तुझा आवाज नाही—
पण तुझी हाक आहे.
तुझा हात नाही—
पण डोक्यावर
तुझ्या मायेची ऊब आहे.
आणि म्हणूनच, बा...
तू गेलास तरी
आमच्या जगण्यातून
कधीच गेला नाहीस.
गावच्या शिवारात दिसतोस, बा...
माझ्या प्रत्येक श्वासात दिसतोस, ***बा*** ...
आणि माझ्या हृदयाच्या
शेवटच्या ठोक्यापर्यंत
दिसत राहशील, ***बा...***

**प्रा.डॉ. शेख आरिफ ताजुद्दीन**


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६


## महिलांची सुरक्षा व सन्मान” या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न




**बीडकीन :** एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालय बिडकीन येथे झालेल्या कार्यशाळेसाठी डॉ. अनिता फुलवाडे, सहाय्यक प्राध्यापक, शिक्षण विभाग, MGM University, यांना प्रमुख मार्गदर्शक/साधन व्यक्ती म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे डॉ. रामकिसन मुंडे IQAC Cordi. उपस्थित होते. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष डॉ. अर्चना काटकर, सदस्य डॉ.मुखत्यार शेख व्यासपीठावर उपस्थित होते. महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समितीची आवश्यकता आणि त्या अनुषंगाने या समितीत चालणारे कार्य आणि या कार्यशाळेचे आयोजन करण्याची भूमिका प्रास्ताविक करताना डॉ. काटकर यांनी मांडलीकार्यशाळेच्या माध्यमातून महिलांच्या सुरक्षिततेचे महत्त्व, महिलांचे अधिकार, कार्यस्थळी सुरक्षित व सन्मानजनक वातावरण, लैंगिक छळास प्रतिबंध, तक्रार निवारणाची प्रक्रिया तसेच महिलांनी आपल्या अधिकारांविषयी जागरूक असण्याची गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.डॉ. अनिता फुलवाडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थिनींना स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सजग राहणे, अन्याय किंवा छळाच्या प्रसंगी आवाज उठविणे आणि उपलब्ध तक्रार निवारण यंत्रणेचा योग्य प्रकारे वापर करणे याबाबत माहिती दिली. तसेच सुरक्षित, सन्मानजनक आणि भेदभावमुक्त शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयाने सजग राहिले पाहिजे असे सांगितले. अध्यक्ष समारोप करताना डॉ. मुंडे रामकिसन यांनी डिजिटल युगामध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनी अनेक सोशल मीडियाचा वापर करताना जागरूक पद्धतीने करावा त्यामध्ये कुठल्याही गुन्ह्यामध्ये अडकू नये आणि सर्व विद्यार्थ्यांनी चौकस दृष्टीने वागावे असे प्रतिपादित केले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन डॉ.अंजली काळे यांनी केले. तर कार्यक्रमाचा एकूण आढावा घेत डॉ.मुखत्यार शेख यांनी सर्वांचे आभार मानले. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेदरम्यान उपस्थितांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संवादात्मक पद्धतीने झालेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित विविध बाबी समजून घेण्यास मदत झाली.

## तिसगावच्या आदिवासी मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम निकृष्ट ? दर्जाबाबत प्रश्नचिन्ह

**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : तालुक्यातील तिसगाव येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा संलग्नित असलेल्या आदिवासी मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम सुरू असून, या कामाच्या दर्जाबाबत स्थानिक नागरिकांकडून, आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य शाखा खुलताबाद तालुका या फाउंडेशन कडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बांधकामात वापरण्यात येणारे साहित्य, कामाची पद्धत तसेच इमारतीच्या मजबुतीबाबत नागरिकांनी शंका व्यक्त केल्या आहेत.आदिवासी विद्यार्थिनींसाठी महत्त्वाची असलेली ही इमारत सुरक्षित आणि दर्जेदार असणे आवश्यक असताना बांधकामात निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा आरोप आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य शाखा खुलताबाद तालुका व पालकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने बांधकामाची तांत्रिक तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.वसतिगृहाच्या बांधकामासाठी शासनाचा निधी खर्च होत असल्याने कामाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेची काटेकोर तपासणी होणे गरजेचे आहे. भविष्यात विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक पथकामार्फत पाहणी करण्यात यावी आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही पुढे येत आहे.






## प्रत्येक व्यक्तीने नियमीत आरोग्य तपासणी करणे गरजेचे - कुलगुरु प्रा. डॉ. व्यंकट गिते




**नाशिक :** प्रत्येक व्यक्तीने नियमीत आरोग्य तपासणी करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मा. कुलगुरु प्रा.डॉ. व्यंकट गिते यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वास्थ्यासाठी 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६' या उपक्रमांतर्गत विद्यापीठात एकदिवसीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या शिबिराचे उद् घाटन विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा.डॉ. व्यंकट गिते यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, वित्त व लेखाधिकारी श्री. बोधिकिरण सोनकांबळे, अधिष्ठाता डॉ. स्वाती जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन गायकवाड, वैद्य उदय तळहार आदी उपस्थित होते. याप्रसंगी कुलगुरु प्रा.डॉ. व्यंकट गिते यांनी सांगितले की, शासनाने आदेशित केल्यानुसार गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात समाजातील लोकांची आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वपूर्ण आहे. विद्यापीठात आयुर्वेद दिनाचे औचित्य साधत आरोग्य तपासणी शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी विविध आरोग्य तपासण्यांसह अग्नीकर्म चिकित्सा पध्दतीचे तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले. या योजनेचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादीत नसून समाजात आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करणे असा आहे असे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले की, समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन कामाच्या व्यापात आपण आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष करतो. परंतु, निरोगी शरीर आणि प्रसन्न मन हीच खरी संपत्ती आहे. 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६' या उपक्रमाद्वारे सर्वांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याची एक उत्तम संधी उपलब्ध झाली असून, सर्वांनी नियमित आरोग्य तपासणी करुन आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करावा.याप्रसंगी कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि त्यांचे आरोग्य जपण्याला विद्यापीठाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. सध्याच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या युगात उच्च रक्तदाब, मधुमेह यांसारखे आजार वेळेत ओळखणे गरजेचे झाले आहे. अशा आरोग्य तपासणी शिबिरांमुळे संभाव्य धोके आधीच लक्षात येतात आणि त्यावर वेळीच उपचार करणे शक्य होते असे त्यांनी सांगितले.याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन गायकवाड यांनी सांगितले की, आजच्या या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ई.सी.जी., रक्तशर्करा, हिमोग्लोबिन आणि रक्तदाब यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या चाचण्या मोफत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. चाचण्यांचे अहवाल आल्यानंतर गरजेनुसार संबंधित कर्मचाऱ्यांना पुढील उपचार, आहार आणि दिनचर्येबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी आरोग्य शिबिरात वैद्य उदय तळहार यांनी अग्निकर्म चिकित्सा संदर्भात विविध आजारांवर करण्यात येणारे उपचार पध्दती व त्याबाबत मार्गदर्शन केले.यावेळी, डॉ. प्रदीप आवळे, डॉ. मनिषा काळे, डॉ. श्वेता चौधरी, डॉ. गितांजली कार्ले, डॉ. अनुश्री नेटके, श्रीमती मानसी हिरे, डॉ. सागर महाजन, डॉ. आगीवाल व महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्थेतील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. या आरोग्य तपासणी शिबिरात मोठया प्रमाणात रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६

# सद्रक्षणाय खलनिग्रहणाय: आदर्शांची पडझड आणि कटू वास्तव

भारतीय समाजातील सर्वसामान्य नागरिकांसाठी राज्याचा चेहरा म्हणजे पोलीस. आणि हा चेहरा बहुतांश वेळा निव्वळ दहशतीचा असतो. रस्त्याच्या कोपऱ्यावर उभ्या असलेल्या पोलिसांपासून, पोलीस ठाणे, रस्त्यावरील अडथळे (बॅरिकेड्स) किंवा चौकशीची खोली—यांच्या माध्यमातूनच सामान्य नागरिकाचा राज्याशी संबंध येतो. ज्येष्ठ पत्रकार कुलदीप नायर यांनी एकदा निरीक्षण नोंदवले होते की, सामान्य माणसाचा पोलिसांशी येणारा पहिला संबंध बहुधा शिवीगाळ आणि दंडुक्यानेच सुरू होतो. राज्यघटनेने नागरिकांना अनेक अधिकारांचे आश्वासन दिले असले तरी पोलिसांना पाहताच हे अधिकार जणू हवेत विरून जातात. विरोधाभास असा की, पोलिस नेहमीच आपल्या ब्रीदवाक्यात ‘सेवेची’ भाषा वापरतात. उदाहरणार्थ, दिल्ली पोलिस "शांती, सेवा, न्याय" अशी घोषणा करतात, तर महाराष्ट्र पोलिस “सद्रक्षणाय खलनिग्रहणाय” हे संस्कृत ब्रीदवाक्य मिरवतात, ज्याचा अर्थ सुशिक्षितांना समजणेही कठीण जाते. याचा अर्थ "सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा संहार." असा होतो. “सेवा, सुरक्षा, न्याय” हेही अनेकदा आदर्श पोलीसव्यवस्थेचे ध्येय म्हणून मांडले जाते. प्रत्यक्षात मात्र सामान्य नागरिकांसाठी पोलीस अनेकदा याच्या अगदी उलट भूमिका बजावताना दिसतात. सेवेची ही भाषा प्रामुख्याने श्रीमंत आणि सत्ताशाली अशा मूठभर वर्गासाठीच लागू असल्याचे दिसते. सामान्य माणसाचा अपमान करणे आणि त्याच्याशी गैरवर्तन करणे हे पोलिसांच्या दैनंदिन कार्यपद्धतीचे भाग बनले आहेत. क्रूरताही काही असामान्य राहिलेली नाही; गुन्ह्याची कबुली मिळवण्यासाठी आणि निरपराध व्यक्तींना गुन्ह्यात अडकवण्यासाठी पोलिसांकडून कोठडीत मारहाण केली जाते. मुंबईतील कुख्यात ७/११ रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरण याचे अंगावर काटा आणणारे उदाहरण आहे. ११ जुलै २००६ रोजी मुंबईच्या उपनगरीय रेल्वेगाड्यांमध्ये सात बॉम्बस्फोट झाले, ज्यात १८९ निरपराध मारले गेले आणि ८०० हून अधिक जखमी झाले. या प्रकरणात अनेक मुस्लिम तरुणांना ताब्यात घेण्यात आले आणि त्यांनी न केलेल्या गुन्ह्याची कबुली देण्यासाठी त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आल्याचा आरोप झाला. १३ जणांवर खटला चालवला गेला; २०१५ मध्ये १२ जणांना दोषी ठरवून त्यांपैकी पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. मात्र, जुलै २०२५ मध्ये, मुंबई उच्च न्यायालयाने फिर्यादी पक्षाला त्यांचा गुन्हा संशयापलीकडे सिद्ध करता आला नाही असे नमूद करत सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्यांच्या विरोधातील आरोप वाजवी संशयापलीकडे सिद्ध करण्यात अभियोजन पक्ष अपयशी ठरल्याचे न्यायालयाने नमूद केले. काहींनी आयुष्याची तब्बल १९ वर्षे तुरुंगात घालवली होती. न्यायालयाने सरकारी पक्षाच्या पुराव्यांमध्ये—विशेषतः साक्षीदारांची विश्वासार्हता आणि दबावातून घेतलेल्या कबुलीजबाबांमध्ये—गंभीर त्रुटी शोधून काढल्या. बचाव पक्षाचा आरोप होता की, हे जबाब छळ करूनच लिहून घेण्यात आले होते. निर्दोष मुक्त झालेल्यांपैकी अब्दुल वाहिद शेख यांनी पुढे ‘इनोसंट प्रिझनर’ (Innocent Prisoner) नावाचे पुस्तक लिहिले, ज्यामध्ये त्यांनी कबुलीजबाब मिळवण्यासाठी पोलिसांनी केलेल्या छळाचे तपशीलवार वर्णन केले आहे. आयपीएस अधिकारी सुनील रामानंद यांच्या ‘कॉप्स इन अ क्वॅगमायर’ (Cops in a Quagmire) या काल्पनिक पुस्तकाचे परीक्षण मी ‘द वायर’साठी केले होते; त्यातही हाच मुद्दा मांडण्यात आला होता. ‘कोठडीतील छळ बेकायदेशीर आहे हे प्रत्येकाला ठाऊक आहे, तरीही त्याला सर्वसामान्य आणि स्वीकारार्ह बाब म्हणून पाहिले जाते.’ भारतीय कायद्यानुसार कोठडीतील अत्याचार हा मूलभूत अधिकारांचा, विशेषतः संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवन, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्याचे गंभीर उल्लंघन मानतो. तरीही भारतात सरकारी अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या छळ/अत्याचाराला स्वतंत्रपणे गुन्हा ठरवणारा सर्वसमावेशक स्वतंत्र ‘अँटी-टॉर्चर’ (छळविरोधी) कायदा अस्तित्वात नाही. त्याऐवजी संरक्षणासाठी संविधान, सर्वसाधारण फौजदारी कायदे, प्रक्रियात्मक सुरक्षा आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश यांवर अवलंबून राहावे लागते. परंतु हे उपाय अत्यंत अपुरे ठरले आहेत. डी.के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (१९९७) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने कोठडीतील हिंसाचाराला ‘सरकारी सत्तेचा अत्यंत विकृत गैरवापर’ म्हटले होते आणि अटक व कोठडीबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली होती. कोठडीत असलेल्या व्यक्तीचे रक्षण करणे ही राज्याची घटनात्मक जबाबदारी आहे, हे न्यायालयाने स्पष्ट केले होते. हे तत्व नुकतेच पुन्हा अधोरेखित करण्यात आले आहे. जुलै २०२५ च्या एका निकालात, कोठडीतील अत्याचाराला बळी पडलेल्या व्यक्तीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, राज्ययंत्रणेने कलम २१ चे उल्लंघन केल्यास घटनात्मक भरपाई दिली जाऊ शकते. तसेच कोठडीतील हिंसेची निष्पक्ष आणि प्रभावी चौकशी करण्याची गरजही न्यायालयाने अधोरेखित केली. जरी ‘कोठडीतील छळ’ (custodial torture) असा स्वतंत्र गुन्हा नमूद नसला, तरी ‘भारतीय न्याय संहिता’ (BNS) अशा कृत्यांना गुन्हेगारी मानत शिक्षेची तरतूद करते—ज्यामध्ये स्वेच्छेने दुखापत किंवा गंभीर दुखापत पोहोचवणे, घातक साधनांचा वापर, कबुली मिळवण्यासाठी इजा करणे आणि बेकायदेशीरपणे डांबून ठेवणे यांचा समावेश होतो. त्यामुळे कबुलीजबाब मिळवण्यासाठी कैद्याला मारहाण करणारा पोलिस अधिकारी तपासाची कायदेशीर पद्धत वापरत नसून तो थेट गुन्हा करत असतो. या समस्येचे गांभीर्य आकडेवारीतूनही स्पष्ट होते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या (NHRC) आकडेवारीनुसार, २००४- ०५ ते २०१३-१४ या यूपीए सरकारच्या दहा वर्षांच्या काळात पोलीस कोठडीत १,३९३ मृत्यू झाले. त्यानंतरच्या २०१४- १५ ते २०२३-२०२४ या दहा वर्षांत ही संख्या १,५१५ झाली. म्हणजे मोदी सरकारच्या काळात सरासरी जवळपास ९ टक्क्यांची वाढ झाली. नोंदवलेल्या पोलिस अत्याचारांची आकडेवारीही चिंताजनक आहे. NHRC च्या आकडेवारीवर आधारित २०१६ मधील लोकसभा उत्तरानुसार, पोलिस अत्याचारांची प्रकरणे २०१३-१४ मध्ये ३०३ वरून २०१४-१५ मध्ये १३४ आणि २०२५ २०१५- १६ मध्ये ४९३ झाली. त्याच वर्षांमध्ये पोलीस कोठडीतील मृत्यू अनुक्रमे १४०, १३० आणि १५३ होते. त्यानंतरच्या आकडेवारीतही लक्षणीय सुधारणा झाल्याचे दिसत नाही. एनएचआरसीने २०२१-२२ मध्ये १७५, २०२२-२३ मध्ये १६८ आणि २०२३-२४ मध्ये १६० कोठडीतील मृत्यूंची नोंद केली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अहवालानुसार २०२४-२५ मध्ये १४०, तर २०२५-२६ च्या पहिल्या ७४ दिवसांतच १७० मृत्यू झाले. याहूनही चिंतेची बाब म्हणजे शासकीय आकडेवारीतच प्रचंड तफावत आढळते. 'स्टेटस ऑफ पोलिसिंग इन इंडिया रिपोर्ट २०२५' ने NCRB, NHRC आणि नागरी संघटनांच्या आकडेवारीत लक्षणीय विसंगती नोंदवली असून अनेक घटना दडपल्या जात असल्याचे म्हटले आहे. जनमानसातील प्रतिमा जपण्यासाठी आकडेवारीत फेरफार करणे हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांचे धोरण राहिले आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या छळविरोधी करारावर (UN Convention Against Torture) स्वाक्षरी केली आहे, पण त्याचे अद्याप प्रमाणीकरण केलेले नाही, आणि संसदेनेही छळविरोधी कोणताही सर्वसमावेशक कायदा केलेला नाही. त्यामुळे कोठडीतील छळाची स्वतंत्र व्याख्या करणारी किंवा त्याच्या तपासासाठी विशेष कार्यपद्धती पुरवणारी कोणतीही वैधानिक व्यवस्था देशात नाही. पोलिसी क्रूरता ही केवळ काही वैयक्तिक पोलिसांची समस्या नसून ती खुद्द पोलिस यंत्रणेच्या आणि राज्यसत्तेच्या स्वरूपाची समस्या आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. १९४७ मध्ये सत्ता बदलली. परंतु, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्याचे वलय असलेल्या नव्या राज्यकर्त्यांनी तीच वसाहतवादी राज्ययंत्रणा पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. देशाच्या भीषण फाळणीच्या पार्श्वभूमीवर हे एका अर्थाने समजण्यासारखे होते. पण त्यावेळी तयार होत असलेल्या संविधानाकडून ही यंत्रणा एका प्रजासत्ताक रचनेत बदलली जाईल अशी अपेक्षा होती. मात्र संविधानाने स्वतःच शेवटच्या वसाहतवादी कायद्यातील म्हणजेच 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५' मधील बऱ्याच तरतुदी स्वीकारल्या आणि बहुतांश कायदे न बदलता पूर्वीच्या राज्ययंत्रणेलाच मान्यता दिली. १८५७ च्या उठावानंतर वसाहतवादी नियंत्रण घट्ट करण्यासाठी तयार करण्यात आलेला 'पोलिस कायदा, १८६१' हाच स्वातंत्र्योत्तर पोलिसांचा संस्थात्मक पाया राहिला. ब्रिटिश परकीय सत्तेला विरोध करणाऱ्या जनतेला चिरडण्यासाठी निर्माण केलेले पोलिस दल हे त्या वसाहती व्यवस्थेचे दमनाचे साधन होते. याचा अर्थ असा नाही की पोलीस सुधारणा करण्याचे प्रयत्न झाले नाहीत. १९७० च्या दशकापासून हे प्रयत्न सुरू झाले, परंतु पोलिसांवरील राजकीय नियंत्रण सोडण्याची राजकीय इच्छाशक्ती कधीच दिसली नाही. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ एम. एस. गोरे यांच्या अध्यक्षतेखालील 'गोरे समितीने' (१९७१-७३) पोलिस प्रशिक्षणाचा अभ्यास करून व्यापक संरचनात्मक त्रुटी मांडल्या. त्यांनी १८६ शिफारसी केल्या, त्यापैकी ४५ पोलिस सुधारणांशी संबंधित होत्या. पण त्यांच्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. त्यानंतरही अनेक आयोग आणि समित्यांनी याच समस्येचे निदान केले—राजकीय हस्तक्षेप, व्यावसायिक स्वायत्ततेचा अभाव, जबाबदारीची वानवा आणि वसाहतवादी हुकूमशाही रचना. १९७० च्या उत्तरार्धात ‘राष्ट्रीय पोलिस आयोगाने’ यावर अहवाल दिला. माजी पोलिस अधिकारी ज्युलिओ रिबेरो, माजी आयएएस अधिकारी के. पद्मनाभय्या आणि कर्नाटक व केरळ उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती व्ही. एस. मलिमथ यांनी १९९० आणि २००० च्या दशकात या मुद्द्याचा फेरआढावा घेतला. २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ‘प्रकाश सिंह’ प्रकरणात यातील अनेक शिफारशींचे रूपांतर बंधनकारक निर्देशांमध्ये केले. तरीही तीच जुनी व्यवस्था टिकून राहिली. विरोधाभास असा आहे की, सरकारे वारंवार व्यावसायिक आणि लोकाभिमुख पोलिसव्यवस्थेची गरज व्यक्त करतात; पण पोलिसांना राजकीय दबावापासून मुक्त करणाऱ्या सुधारणा करण्यास मात्र विरोध करतात. पक्षपाती पोलीसव्यवस्था हा एका अशा व्यवस्थेचा परिणाम आहे जिचे वारंवार रोगनिदान झाले, न्यायालयातून बदल करण्याचे आदेश आले, परंतु राजकीय हेतूंसाठी ती तशीच जपून ठेवली गेली. स्वातंत्र्योत्तर पोलिसांनी वसाहतवादी मानसिकता, पद्धती आणि संस्थात्मक धारणा बऱ्याच अंशी तशाच जपल्या. संविधानाने राज्याला प्रजासत्ताक स्वरूप दिले आणि जनतेला सार्वभौम मानले, तरी पोलिसव्यवस्थेचा हा वारसा कायम राहिला. वसाहतवादी राज्यकर्त्यांना आपले साम्राज्य टिकवण्यासाठी एक स्थिर, अंदाज बांधता येण्याजोगी आणि व्यावसायिक प्रशासकीय व्यवस्था हवी होती—प्रजेविषयीच्या दयेपोटी नव्हे, तर प्रभावी नियंत्रणासाठी. दुसरीकडे, दर पाच वर्षांच्या निवडणूक चक्रात अडकलेल्या स्वातंत्र्योत्तर राज्यकर्त्यांना आपल्या राजकीय फायद्यासाठी आणि संरक्षणाच्या बदल्यात प्रशासन व पोलिसांचा वापर करण्याचे अधिक प्रलोभन होते. राजकीय नेत्यांना स्थानिक गुन्हेगारांमध्ये सोयीचे साथीदार सापडले; ज्यांनी निवडणुकीत मते मिळवून दिली आणि विरोधकांना धमकावले. बदल्यात या गुन्हेगारांना कायद्यापासून वाचण्यासाठी राजकीय संरक्षणाची गरज होती. काळाच्या ओघात या परस्पर संबंधांतून 'राजकारणी-नोकरशहा-पोलिस-गुन्हेगार' यांची अभद्र युती तयार झाली. २०१४ मध्ये केंद्रात भाजप सत्तेवर आल्यावर आणि गुजरातमध्ये १२ वर्षे अनियंत्रित व हुकूमशाही पद्धतीने राज्य चालवणारे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर या संस्था पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्या. पोलिस ही संस्था मुळातच उजव्या विचारसरणीच्या राजकारणाला पोषक ठरणारी असते. ती एक उतरंड असलेली आणि हुकूमशाही प्रवृत्तीची संस्था आहे, जी त्याच बहुसंख्याक समाजातून आलेली असते. तिची कार्यसंस्कृती शिस्त, आज्ञापालन आणि अधिकाराला महत्त्व देते; तर राजकीय सत्ताधाऱ्यांवरील अवलंबित्व बदल्या, पदोन्नती आणि संरक्षणासाठी सत्तेशी जुळवून घेणाऱ्यांनाच बक्षीस देते. हिंदू राष्ट्रवाद अशा प्रकारची वैचारिक भाषा उपलब्ध करून देतो, ज्यात असहमती म्हणजे अव्यवस्था, तर अल्पसंख्याकांना संशय व सुरक्षेच्या संकुचित दृष्टिकोनातून पाहिले जाते. राजकीय पाठबळ या सांस्कृतिक जवळीकीचे रूपांतर संस्थात्मक वर्तनात करते. यातून अशी पोलिस यंत्रणा उभी राहते जी सत्ता, बहुसंख्याक राष्ट्रवाद आणि दडपशाहीचे गोडवे गाणाऱ्या राजकारणाला सहज बळी पडते. भाजपच्या राजवटीत पोलिसांनी आणखी धोकादायक राजकीय स्वरूप धारण केले आहे. ती आता केवळ प्रशासकीय अधिकाराचे साधन उरलेली नसून तीव्र ध्रुवीकरणाच्या राजकीय वातावरणात वापरली जाणारी पक्षपाती फौज बनली आहे. उजव्या विचारसरणीच्या प्रत्येक मोहिमेत—मग ती ‘घरवापसी’ असो, ‘लव्ह जिहाद’, ‘गो-तस्करी’, ‘बुलडोझर न्याय’ असो किंवा निवडणुका—पोलिसांनी भाजपच्या बाजूने थेट भूमिका बजावली आहे. २०१४ पासून भाजपच्या बाजूने पोलिसांच्या पक्षपातीपणाची अनेक उदाहरणे आहेत. २०२० च्या सीएए (CAA) विरोधी आंदोलनादरम्यान, भाजप नेते कपिल मिश्रा यांनी दिल्ली पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बाजूला उभे राहून आंदोलकांना हटवण्यासाठी पोलिसांना जाहीर धमकी दिली. दुसऱ्याच दिवशी जातीय हिंसाचार उसळला. नंतर दिल्ली उच्च न्यायालयाने प्रक्षोभक भाषणांवर भाजप नेत्यांवर एफआयआर (FIR) न नोंदवल्याबद्दल पोलिसांना खडसावले. तरीही, संशयित मुस्लिम विद्यार्थी तुरुंगात सडत असून त्यांच्या अटकेचे हे सहावे वर्ष आहे. जेएनयूमध्ये ५ जानेवारी २०२० रोजी, पोलिसांना २३ फोन कॉल्स जाऊनही, एका मुखवटाधारी जमावाने विद्यार्थी आणि शिक्षकांवर तासनतास हल्ले केले; पण पोलिसांनी कॅम्पसमध्ये प्रवेश करण्यास जाणीवपूर्वक उशीर केला. नंतरच्या अंतर्गत चौकशीत पोलिसांनी स्वतःलाच क्लिन चिट दिली. २०२३ मध्ये, एका अल्पवयीन मुलीसह सात महिला कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचा आरोप करूनही दिल्ली पोलिसांनी भाजप खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतरच गुन्हा दाखल झाला; तोपर्यंत आंदोलक कुस्तीपटूंनाच फरफटत नेऊन ताब्यात घेतले गेले. तसेच जहांगीरपुरीमध्येही मागील वर्षीच्या जातीय हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर रामनवमीच्या मिरवणुकीला परवानगी नाकारण्यात आली होती. तरीही पोलिसांनी हिंदुत्ववादी गटांमधील सुमारे १००० लोकांना भगवे झेंडे आणि घोषणांसह मिरवणूक काढण्याची परवानगी दिली. दिल्लीतील ‘सीजेपी’च्या जंतरमंतरवरील आंदोलनादरम्यान आणि त्यानंतर घडलेल्या घटनांनी पोलिसांचा भाजपधार्जिणा चेहरा पुन्हा उघडा पाडला. २० जुलै रोजी जेव्हा आंदोलक केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी संसदेवर मोर्चा काढत होते, तेव्हा दिल्ली पोलिसांनी विद्यार्थ्यांवर अमानुष बळाचा वापर केला. ‘ॲम्नेस्टी इंटरनॅशनल’ने व्हिडिओ पुराव्यांच्या स्वतंत्र तपासणीनंतर या कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. लाठ्या आणि खिळे ठोकलेल्या दंडुक्यांशिवाय पोलिसांनी अश्रुधूर आणि पॅलेट गनचा वापर केला. पोलिसांनी सुरुवातीला पॅलेट गनचा वापर नाकारला असला तरी वैद्यकीय अहवालात पॅलेटच्या जखमांची नोंद झाली. १९ वर्षीय साहिल लोचब याच्या डोळ्याला पॅलेटच्या गोळ्या लागून गंभीर इजा झाली. त्याच्या कुटुंबीयांनी एफआयआर नोंदवण्यासाठी धाव घेतली असता पोलिसांनी स्पष्ट नकार दिला. यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेस नेत्यांसह पार्लमेंट स्ट्रीट पोलिस ठाण्याबाहेर तब्बल सात तास धरणे धरले, तेव्हा कुठे पोलिसांनी गुन्हा नोंदवला. एखाद्या घटनात्मक लोकशाहीसाठी ही घटना अत्यंत लाजीरवाणी आहे. जंतरमंतरवरील आंदोलनात दिल्ली पोलिसांनी ‘फेशिअल-रेकग्निशन’ (चेहरा ओळखण्याच्या) तंत्रज्ञानाचा केलेला वापर गंभीर घटनात्मक प्रश्न निर्माण करतो. ‘के. एस. पुट्टास्वामी’ प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की गोपनीयतेच्या अधिकारावरील कोणत्याही अतिक्रमासाठी तीन अटी आवश्यक आहेत: कायदेशीर अधिष्ठान, राज्याचा वैध हेतू आणि प्रमाणबद्धता. आंदोलकांवर बायोमेट्रिक पाळत ठेवण्यासाठी कोणताही स्पष्ट वैधानिक आधार असल्याचे किंवा ही पाळत आवश्यक आणि प्रमाणबद्ध होती हे पोलिस सिद्ध करू शकलेले नाहीत. पोलिसांच्या स्वतःच्या दाव्यांमुळेच या घटनात्मक आक्षेपांना पुष्टी मिळते: त्यांनी दावा केला की या यंत्रणेने आंदोलनाच्या ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या २,८७३ व्यक्तींची ओळख पटवली असून पडताळणीनंतर कारवाई केली जाईल. मात्र तपासात असे निष्पन्न झाले की त्या ओळख पटवलेल्यांपैकी किमान २५ जण जंतरमंतरवरील आंदोलनाच्या वेळी आधीच तुरुंगात बंद होते. दलित विद्यार्थी आंदोलक निशू आझाद यांचे वडील संजय कुमार यांचे प्रकरणही पोलिसांच्या पक्षपाती भूमिकेचे आणखी एक उदाहरण आहे. जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान कुमार यांच्यावर स्वतःला हिंदुत्ववादी कार्यकर्ता म्हणवणाऱ्या स्वतंत्र भारद्वाज याने प्राणघातक हल्ला केला. भारद्वाजने नंतर एका पॉडकास्टमध्ये उघडपणे शेखी मिरवली की त्याने निशूच्या वडिलांचे डोके फोडले आणि तरीही राजकीय लागेबांध्यांमुळे तो अटकेपासून वाचला. गुन्ह्याची जाहीर कबुली देणाऱ्या आरोपीवर कारवाई करण्याऐवजी दिल्ली पोलिसांनी जखमेचे गांभीर्य कमी दाखवण्याचा प्रयत्न केला. पोलीस ठाण्याबाहेर पुन्हा आंदोलन छेडल्यानंतरच पोलिसांनी कारवाईचे आश्वासन देऊन अखेर भारद्वाजला अटक केली. प्रत्येक कायद्याची पायमल्ली करत भाजपच्या सोयीसाठी कारवाई करणे किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे या दोन्हीमध्ये पोलिसांची भूमिका स्पष्ट दिसते. गुजरातमध्ये पोलिसांनी मुस्लिम तरुणांना मारहाण केल्याच्या दोन ताज्या घटनांचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. पहिली घटना मे २०२६ मधील वेजलपूर, अहमदाबाद येथील आहे. गोहत्येच्या कथित प्रकरणात मोहम्मद अझीझ शेख उर्फ रईस शेख नावाच्या मुस्लिम व्यक्तीला इतरांसह अटक करण्यात आली. एका व्हायरल व्हिडिओमध्ये पोलिस कर्मचारी त्याला पोलिस गाडीच्या बोनेटला बांधून सर्वांसमक्ष काठ्यांनी मारहाण करताना दिसले. त्यानंतर ‘मायनॉरिटी कोऑर्डिनेशन कमिटी गुजरात’ने वरिष्ठ सरकारी व पोलिस अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस पाठवून, हा कायद्याबाहेरचा अमानुष प्रकार असल्याचे नमूद करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. दुसरी घटना नुकतीच ५ सप्टेंबर रोजी भावनगर येथे घडली. एका हत्येतील २० वर्षीय मुस्लिम आरोपी फैजल उर्फ खटकी रफिक लखानी याला गुन्ह्याच्या घटनास्थळाच्या पुनर्निर्मितीसाठी (crime-scene reconstruction) नेण्यात आले होते. तेथे त्याला पोलिसांच्या जीपच्या मागे दोरीने बांधून भरचौकात लाठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे पोलिस निरीक्षक डी. पी. उनाडकट यांनी या कृत्याचे समर्थन करताना म्हटले की, ‘समाजात धाक निर्माण करण्यासाठी’ आणि पोलिसांवरील जनतेचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी हे आवश्यक होते. यावर ‘पीयूसीएल’च्या (PUCL) गुजरात शाखेने दोषी पोलिसांवर कारवाईची मागणी करणारी कायदेशीर नोटीस बजावली आहे. या घटना केवळ कायद्याचे उल्लंघन नसून पोलिसांच्या अनिर्बंध बेमुर्वतखोरपणाचे उघड प्रदर्शन आहेत. पोलिस अनेकदा आपण कायद्याच्याही वर असल्यासारखे वागतात. अशा पोलिसांना कायद्याच्या कक्षेत आणणे जनतेसाठी अत्यंत खर्चिक व दुरापास्त असते, आणि त्यांना शिक्षा होणे तर त्याहूनही दुर्मिळ. जोपर्यंत पोलिस यंत्रणेला राजकीय सत्तेऐवजी केवळ कायद्याला उत्तरदायी बनवले जात नाही, तोपर्यंत पोलिस सुधारणा केवळ दिखाऊच राहतील. न्यायव्यवस्थाही आतापर्यंत यात सपशेल अपयशी ठरली आहे. ‘प्रकाश सिंह’ खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेली ‘पोलिस तक्रार प्राधिकरणे’ ही कोठडीतील हिंसेसह पोलिसांच्या गंभीर गैरवर्तनाची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी स्थापन केली जाणार होती. परंतु निष्प्रभ अंमलबजावणी, अपुरे अधिकार आणि सरकारी हस्तक्षेपामुळे त्यांची परिणामकारकता पूर्णपणे मोडीत निघाली आहे. पोलिस स्वतःवर झालेल्या अत्याचाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी कधीच करू शकत नाहीत. त्यामुळे कोठडीतील हिंसाचार, बेकायदेशीर डांबून ठेवणे, एफआयआर नोंदवण्यास नकार आणि पक्षपाती पोलिसींग यांसारख्या तक्रारी थेट नागरी हक्क कार्यकर्ते आणि निवृत्त न्यायाधीशांचा समावेश असलेल्या, साधनसंपत्तीने सुसज्ज अशा स्वतंत्र प्राधिकरणाकडेच गेल्या पाहिजेत. बदल्या, नियुक्त्या आणि तपासांमध्ये होणारा राजकीय हस्तक्षेप हा पक्षपाती पोलिसिंगच्या मुळांपैकी एक आहे. यावरचा उपाय पोलिसांना लोकशाही नियंत्रणापासून पूर्णपणे मुक्त करणे हा नाही. उलट, हे नियंत्रण पारदर्शक आणि कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादांमध्ये आणणे आवश्यक आहे. प्रकाश सिंह प्रकरणातील सुरक्षा उपाय—पदावरील निश्चित कार्यकाळ, स्वतंत्र तक्रार प्राधिकरणे, तपास आणि कायदा-सुव्यवस्था यांचे विभाजन आणि व्यावसायिक निर्णयांना राजकीय दबावापासून संरक्षण देणाऱ्या संस्थात्मक यंत्रणा हे याचे एक उदाहरण आहे. सामान्य नागरिकांचे शासनयंत्रणेच्या तसेच श्रीमंत आणि शक्तिशाली घटकांच्या अन्यायापासून खऱ्या अर्थाने रक्षण व्हावे, यासाठी पोलिसांवर एक प्रभावी व निष्पक्ष नियंत्रण व्यवस्था निर्माण करणे हा आजच्या घडीचा अत्यंत कळीचा मुद्दा आहे.

**लेखक : आनंद तेलतुंबडे**
**हे पेट्रोनेटचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच IIT खरगपूर आणि GIM, गोवा येथे प्राध्यापक राहिले आहेत.**
**ते लेखक आणि नागरी हक्क कार्यकर्तेही आहेत.**
**भाषांतर: प्रा. प्रियदर्शन भवरे**
**साभार : द वायर / १३ सप्टेंबर २०२६**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २४ सप्टेंबर २०२६


# सत्यशोधक समाज : समतेच्या सामाजिक क्रांतीची वाटचाल

२४ सप्टेंबर हा महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. याच दिवशी १८७३ मध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजव्यवस्थेत जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, अज्ञान, धार्मिक कर्मकांड, सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यांचे खोलवर रुजलेले स्वरूप पाहता सत्यशोधक समाजाची स्थापना ही केवळ एका संस्थेची निर्मिती नव्हती, तर प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला विचारांच्या पातळीवर दिलेले मूलभूत आव्हान होते. जन्माच्या आधारावर माणसामाणसांत श्रेष्ठ-कनिष्ठता निर्माण करणाऱ्या व्यवस्थेऐवजी मानवतेवर, समतेवर, विवेकावर आणि शिक्षणावर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न या चळवळीमागे होता. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक समाजाने निर्माण केलेली वैचारिक परंपरा पुढील अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा देणारी ठरली. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्येही सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा संबंध ज्योतिराव फुले यांच्याशी जोडला असून, या चळवळीने सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील पुरोहितसत्तेच्या प्रभावाला आव्हान दिल्याचे नमूद केले आहे.सत्यशोधक समाजाची स्थापना कोणत्या सामाजिक परिस्थितीत झाली हे समजून घेतल्याशिवाय या चळवळीचे ऐतिहासिक महत्त्व पूर्णपणे लक्षात येत नाही. त्या काळात समाजव्यवस्थेवर जन्माधिष्ठित जातिभेदाचा मोठा प्रभाव होता. शिक्षण, धार्मिक विधी, ज्ञानसंपादन आणि सामाजिक प्रतिष्ठा यांमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती. बहुजन समाजातील अनेक घटक शिक्षणापासून दूर होते. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्यक्षात उपलब्ध नव्हता. विधवांचे जीवन अत्यंत कठीण होते. बालविवाह, अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या प्रथा समाजातील मोठ्या घटकांच्या जीवनावर परिणाम करीत होत्या. या परिस्थितीत केवळ धार्मिक सुधारणा पुरेशा नाहीत, तर समाजातील सत्तासंबंध, ज्ञानाचे नियंत्रण आणि सामाजिक प्रतिष्ठेचे निकष यांचाही पुनर्विचार झाला पाहिजे, असा विचार ज्योतिराव फुले यांच्या कार्यातून पुढे आला.ज्योतिराव फुले यांचे सामाजिक विचार त्यांच्या स्वतःच्या अनुभवातून आणि तत्कालीन समाजाच्या निरीक्षणातून विकसित झाले. त्यांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे प्रभावी साधन मानले. सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेले कार्य भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू करण्याच्या कार्यापासून त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांना व्यापक दिशा मिळाली. पुढे वंचित आणि तथाकथित अस्पृश्य समाजातील मुला-मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडण्याचा प्रयत्न करण्यात आला. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका म्हणून या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे फुले दाम्पत्याचे कार्य हे केवळ स्त्रीशिक्षणापुरते मर्यादित नव्हते; ते शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समतेची पायाभरणी करणारे व्यापक अभियान होते. उच्च शिक्षण किंवा ज्ञान काही मोजक्या घटकांची मक्तेदारी न राहता समाजातील सर्व घटकांना उपलब्ध झाले पाहिजे, हा या कार्याचा मूलभूत आशय होता.सत्यशोधक समाजाच्या नावातच त्याच्या कार्याची दिशा दडलेली आहे. 'सत्याचा शोध घेणारा समाज' ही त्याची मूलभूत संकल्पना होती. परंपरेला केवळ परंपरा म्हणून स्वीकारण्याऐवजी तिची सामाजिक उपयुक्तता आणि मानवी परिणाम तपासले पाहिजेत, असा विवेकवादी दृष्टिकोन या चळवळीने पुढे आणला. व्यक्तीची प्रतिष्ठा तिच्या जन्मावर नव्हे, तर तिच्या माणूसपणावर आधारित असली पाहिजे, हा विचार सत्यशोधक समाजाच्या केंद्रस्थानी होता. त्यामुळे जात, जन्म, धार्मिक मध्यस्थी आणि सामाजिक दर्जा यांच्या आधारावर माणसाची किंमत ठरवण्याला या चळवळीने विरोध केला. सामाजिक समता ही केवळ धार्मिक किंवा नैतिक कल्पना नसून प्रत्यक्ष सामाजिक व्यवहाराचा आधार असली पाहिजे, अशी भूमिका या चळवळीच्या कार्यातून दिसून येते.सत्यशोधक समाजाने धार्मिक कर्मकांडाच्या नावाखाली निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेवरही प्रश्न उपस्थित केले. ज्योतिराव फुले यांच्या मते धार्मिक विधी आणि संस्कार यांवर काही विशिष्ट घटकांचे नियंत्रण राहिल्यामुळे सामान्य लोकांवर आर्थिक आणि सामाजिक अवलंबित्व निर्माण होत होते. त्यामुळे विवाहासारख्या सामाजिक विधींमध्ये पुरोहिताची अनिवार्यता नाकारण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला. साधेपणा, सामाजिक समता आणि अनावश्यक खर्चाला विरोध यांना महत्त्व देणारे सत्यशोधक विवाह पुढे चळवळीचे वैशिष्ट्य ठरले. अशा प्रकारे सामाजिक सुधारणेचा प्रश्न केवळ विचारांच्या पातळीवर न ठेवता दैनंदिन जीवनातील प्रथा आणि व्यवहारांशी जोडण्याचे काम या चळवळीने केले.या चळवळीचा स्त्रीप्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही महत्त्वाचा होता. स्त्रीला शिक्षणापासून दूर ठेवणे, बालविवाह, विधवांवरील अन्याय आणि स्त्रीच्या स्वातंत्र्यावर असलेली बंधने यांना सामाजिक विषमतेचा भाग म्हणून पाहण्याची आवश्यकता फुले दाम्पत्याच्या कार्यातून स्पष्ट झाली. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी आणि स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी केलेले कार्य सत्यशोधक विचारांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे उदाहरण आहे. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाची खरी प्रगती होऊ शकत नाही, कारण शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विचारशक्ती, आत्मविश्वास आणि अधिकारांची जाणीव निर्माण होते. त्यामुळे सत्यशोधक चळवळीचा स्त्री-मुक्तीच्या इतिहासाशी असलेला संबंध अत्यंत महत्त्वाचा आहे.सत्यशोधक समाजाची भूमिका केवळ जातिभेदाविरोधापुरती मर्यादित नव्हती. शेतकरी आणि श्रमिकांच्या आर्थिक प्रश्नांकडेही ज्योतिराव फुले यांनी लक्ष वेधले. ग्रामीण समाजातील शेतकरी कर्जबाजारीपणा, महसूलव्यवस्था, सावकारी आणि मध्यस्थांच्या शोषणाला सामोरे जात असल्याचे त्यांनी मांडले. शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे तीव्र सामाजिक आणि आर्थिक विश्लेषण केले. सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यांचा परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक आहे, ही जाणीव त्यांच्या विचारांत दिसते. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्येही सत्यशोधक समाजाने शेतकरी, सावकार आणि गावपातळीवरील आर्थिक-सामाजिक संबंधांशी संबंधित प्रश्नांकडे लक्ष दिल्याचे नमूद केले आहे.सत्यशोधक समाजाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचा बहुजन समाजातील आत्मसन्मान जागवण्याचा प्रयत्न. सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ मानल्या गेलेल्या समूहांनी स्वतःच्या जीवनाकडे कमीपणाच्या नजरेने पाहू नये, आपल्या अनुभवांना आणि श्रमांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत आपला सहभाग असला पाहिजे, अशी जाणीव या चळवळीने निर्माण केली. त्यामुळे सत्यशोधक समाज ही केवळ सुधारक संस्था न राहता सामाजिक आत्मभान निर्माण करणारी चळवळ ठरली. समाजातील वंचित घटकांना स्वतःच्या प्रश्नांकडे स्वतंत्रपणे पाहण्याची आणि संघटितपणे मांडणी करण्याची प्रेरणा मिळाली.ज्योतिराव फुले यांच्या विचारांत 'मानव' हा केंद्रबिंदू होता. त्यांनी 'निर्मिक' या संकल्पनेचा उल्लेख करताना सृष्टीच्या निर्मात्यापुढे सर्व मानव समान असल्याचा विचार मांडला. जन्माच्या आधारे निर्माण केलेली श्रेष्ठ-कनिष्ठता ही मानवी मूल्यांशी विसंगत आहे, असा त्यांचा आग्रह होता. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्ये फुले यांच्या विचारांमध्ये मानवतावाद आणि सामाजिक समतेचा आग्रह असल्याचे नमूद केले आहे. तसेच सत्यशोधक समाजाची सदस्यता जातीनुसार बंदिस्त नव्हती; मूलभूत तत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींना त्यात स्थान मिळू शकत होते. त्यामुळे सत्यशोधक समाजाचा संघर्ष विशिष्ट व्यक्ती किंवा समुदायाविरुद्ध नसून जन्माधारित विषमता आणि सामाजिक वर्चस्वाच्या विचारसरणीविरुद्ध होता, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.सत्यशोधक समाजाच्या विचारांचा पुढील काळातील सामाजिक परिवर्तनावर परिणाम झाला. विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समता, शिक्षण आणि मागास घटकांच्या प्रतिनिधित्वासाठी केलेल्या कार्याला सत्यशोधक परंपरेशी वैचारिक जवळीक होती. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक विचारसरणीने पुढे बहुजन आणि ब्राह्मणेतर सामाजिक चळवळींना वैचारिक आधार दिला. महाराष्ट्र गॅझेटियरच्या नोंदीनुसार, ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतर काही काळ चळवळीची गती कमी झाली; पुढे राजर्षी शाहू महाराजांच्या नेतृत्वामुळे आणि आश्रयामुळे सत्यशोधक चळवळीला नव्या टप्प्यात गतिमानता मिळाली.सत्यशोधक परंपरेचा प्रभाव पुढे भारतीय सामाजिक न्यायाच्या व्यापक प्रवाहातही दिसतो. जातिभेद, अस्पृश्यता, सामाजिक प्रतिनिधित्व, शिक्षण आणि मानवी प्रतिष्ठा यांसारखे प्रश्न पुढील सामाजिक आणि राजकीय चळवळींच्या केंद्रस्थानी आले. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर सत्यशोधक समाजाने 'सामाजिक स्तरीकरण' हा केवळ पारंपरिक सांस्कृतिक विषय नसून सत्ता, संसाधने, ज्ञान आणि प्रतिष्ठेच्या असमान वितरणाशी संबंधित प्रश्न आहे, हे अधोरेखित केले. म्हणूनच या चळवळीचे महत्त्व केवळ महाराष्ट्राच्या इतिहासापुरते मर्यादित राहत नाही. भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासात तिचे स्थान महत्त्वाचे आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ई-पीजी पाठ्यक्रमातील समाजशास्त्रीय अभ्याससामग्रीतही सत्यशोधक समाजाला भारतातील जातिविरोधी आणि अस्पृश्यताविरोधी सामाजिक चळवळींच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान दिले आहे.२४ सप्टेंबर २०२६ रोजी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला १५३ वर्षे पूर्ण होत असताना या चळवळीच्या विचारांकडे केवळ ऐतिहासिक स्मृती म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. आधुनिक भारताने संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये स्वीकारली आहेत. अस्पृश्यता कायद्याने रद्द झाली आहे, शिक्षणाचा विस्तार झाला आहे, महिलांसाठी आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी विविध संवैधानिक व कायदेशीर तरतुदी अस्तित्वात आहेत. तरीही सामाजिक पूर्वग्रह, जातीय भेदभाव, स्त्री-पुरुष विषमता, शैक्षणिक संधीतील तफावत, आर्थिक विषमता आणि सामाजिक बहिष्करण यांसारखी आव्हाने पूर्णपणे संपलेली नाहीत. अशा परिस्थितीत सत्यशोधक विचारांचा अर्थ वर्तमान सामाजिक वास्तवाचा विवेकाने शोध घेणे असा होतो.आजच्या डिजिटल आणि माहितीप्रधान युगात 'सत्यशोधन' या संकल्पनेला आणखी एक नवा अर्थ प्राप्त झाला आहे. सामाजिक माध्यमांवर माहितीचा प्रचंड वेगाने प्रसार होत असताना अफवा, अपप्रचार, पूर्वग्रहदूषित माहिती आणि अर्धसत्ये यांपासून सत्य वेगळे करण्यासाठी चिकित्सक विचारशक्ती आवश्यक आहे. फुले यांनी शिक्षण आणि विवेकाला दिलेले महत्त्व आजच्या काळात म्हणूनच अधिक अर्थपूर्ण ठरते. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवणे नव्हे; तर प्रश्न विचारण्याची, पुराव्यांची चिकित्सा करण्याची, अन्याय ओळखण्याची आणि विवेकाधिष्ठित निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे होय. या अर्थाने सत्यशोधक समाजाचा वारसा आधुनिक ज्ञानसमाजासाठीही उपयुक्त आहे.सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचे स्मरण करताना फुले दाम्पत्याच्या कार्यातील परस्परपूरकता लक्षात घेणेही आवश्यक आहे. ज्योतिराव फुले यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध वैचारिक आणि संघटनात्मक संघर्ष उभा केला, तर सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण आणि स्त्री-मुक्तीच्या क्षेत्रात त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. फातिमा शेख यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनीही शिक्षणाच्या प्रसाराच्या कार्यात योगदान दिले. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे एका व्यक्तीचे कार्य नसून सामूहिक प्रयत्नांची प्रक्रिया असते, हा धडा सत्यशोधक परंपरेतून मिळतो.सत्यशोधक समाजाच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे सामाजिक परिवर्तनासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात. कायद्याने समानता घोषित केली तरी सामाजिक मनोवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण, संवाद, संघटन आणि संवेदनशीलता आवश्यक असते. जातीय किंवा लैंगिक पूर्वग्रह केवळ कायद्याने नाहीसे होत नाहीत; ते दैनंदिन व्यवहार, भाषा, कुटुंब, शिक्षणसंस्था, रोजगार आणि सामाजिक संबंधांच्या पातळीवर बदलावे लागतात. म्हणूनच सत्यशोधक विचार आज सामाजिक समतेच्या व्यवहार्य कार्यक्रमाशी जोडण्याची गरज आहे.आजच्या पिढीसमोर रोजगार, शिक्षण, तंत्रज्ञान, पर्यावरण, ग्रामीण विकास आणि सामाजिक न्याय अशी अनेक नवी आव्हाने आहेत. या सर्व प्रश्नांकडे पाहताना सामाजिक विषमतेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणाला शिक्षणाची संधी मिळते, कोण डिजिटल साधनांपासून दूर राहतो, कोणाला रोजगाराच्या समान संधी मिळतात, ग्रामीण आणि शहरी भागातील सुविधांमध्ये किती तफावत आहे, महिलांना आणि वंचित घटकांना निर्णयप्रक्रियेत किती स्थान मिळते, यांसारखे प्रश्न विचारणे म्हणजेच आधुनिक अर्थाने सत्यशोधन होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेला समान महत्त्व देणारी विकासाची संकल्पना ही सत्यशोधक विचारांशी सुसंगत ठरते.सत्यशोधक समाजाचा वर्धापनदिन हा त्यामुळे केवळ ज्योतिराव फुले यांच्या स्मरणाचा दिवस नाही; तो समाजाने स्वतःचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. आपल्या आजूबाजूला अजूनही कोणत्या स्वरूपाची विषमता आहे, कोणत्या समूहांना संधींपासून वंचित राहावे लागते, शिक्षण आणि ज्ञानाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचतो का, स्त्री-पुरुष समानतेची कल्पना प्रत्यक्ष जीवनात किती उतरली आहे आणि सामाजिक प्रतिष्ठेचे निकष अजूनही जन्म, जात किंवा आर्थिक स्थितीवर आधारित आहेत का, हे प्रश्न प्रत्येकाने विचारण्याची आवश्यकता आहे.१८७३ मध्ये ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेव्हा त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी सत्य, विवेक, शिक्षण आणि समतेचा मार्ग स्वीकारला. त्या काळातील परिस्थिती आणि आजचे सामाजिक वास्तव यांत मोठा फरक असला तरी मानवी प्रतिष्ठा, समानता आणि न्याय यांची आवश्यकता कायम आहे. म्हणून सत्यशोधक समाजाचा वारसा जपणे म्हणजे केवळ भूतकाळाचा गौरव करणे नव्हे, तर वर्तमानातील विषमता ओळखून तिच्यावर चिकित्सक विचार करणे आणि अधिक समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे होय. सत्याचा शोध हा एखाद्या एका दिवसापुरता मर्यादित नसतो; तो सतत चालणारी सामाजिक आणि बौद्धिक प्रक्रिया आहे. २४ सप्टेंबरचा सत्यशोधक समाज वर्धापनदिन म्हणूनच प्रत्येकाला प्रश्न विचारण्याची, विवेक जागवण्याची आणि माणसामाणसांतील भेद कमी करून समतेचा समाज घडवण्याची प्रेरणा देणारा दिवस ठरतो. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा खरा सन्मान त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात नसून शिक्षण, समता, बंधुता, स्त्रीसन्मान आणि सामाजिक न्याय या मूल्यांना आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष स्थान देण्यात आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**